- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, २७ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८८ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-


Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075


# राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

## शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा

**वृत्तसंस्था, मुंबई**

दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी १२ उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत असे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्रे व जीपीएस कोऑर्डीनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. शेतकरी बांधवांशी आस्थेवाईक संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६ च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत

दुष्काळाबाबतच्या प्रथम कळ अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये जमीन महसूलात सूट,



पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल), शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज खंडीत केली जाणार नाही, शेतीवर अवलंबून शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी अन्न धान्याचा पुरेसा पुरवठा, टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरु करणे, अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

### पीक नुकसानीच्या मदतीसाठी स्वतंत्र निर्णय

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीबाबत विहित कार्यपद्धतीची पूर्तता झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे मदत जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे पंचनामे व पीक परिस्थितीचे अचूक सर्वेक्षण करण्याच्या प्रक्रियेला शासनाने विशेष महत्त्व दिले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, विद्यार्थी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक त्या सवलती व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत दुष्काळी परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी शासनाने विविध पातळ्यांवर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

### सहा महसूल विभागांतील २६५ तालुक्यांचा समावेश

ट्रिगर-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये राज्यातील विविध महसूल विभागांतील तालुक्यांचा समावेश आहे. ठाणे महसूल विभागातील १२, नाशिक विभागातील ४९, पुणे विभागातील ३५, छत्रपती संभाजीनगर विभागातील ७४, अमरावती विभागातील ५६ आणि नागपूर विभागातील ३९ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे. ठाणे महसूल विभागातील रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, संगमेश्वर व राजापूर तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड व वेंगुर्ला या तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्याचा यामध्ये समावेश नाही. नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील एकूण ४९ तालुक्यांचा, तर पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ३५ तालुक्यांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील ७४ तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांचा, तर नागपूर विभागातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांचा समावेश आहे.


**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


**थोडक्यात**

## १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलतीचे तिकीट देताना एनसीएमसी कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून, त्यासाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यभरातील आगार आणि बसस्थानकांवर सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती एनसीएमसीकार्डने अधिकृत एक्स पोस्टच्या मार्फत दिली.एसटी महामंडळाकडून विविध सामाजिक घटकांना शासन निदेर्शानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. त्यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा समावेश आहे. या सवलतीच्या प्रवासाचे अधिक सुलभ आणि डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी एनसीएमसी कार्ड प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. १ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकीट एनसीएमसी कार्डमधूनच वितरित केले जाणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारक प्रवाशांनी त्यापूर्वी एनसीएमसी कार्डची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. ज्या प्रवाशांकडे कार्यरत एनसीएमसीकार्ड आहे किंवा कार्ड नोंदणी केल्याची क्यूआर कोड असलेली पावती आहे, त्यांना सवलतीचा लाभ मिळणार आहे.

## छत्तीसगडमध्ये ढगफुटीसदृश पाऊस, भामरागडला पुराचा वेढा

### ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला, ५२५ नागरिकांचे स्थलांतर

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

छत्तीसगड राज्य आणि गडचिरोली परिसरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भामरागड



तालुक्याला पुराचा मोठा वेढा पडला आहे. इंद्रावती, पर्लकोटा आणि पामुलगौतम या तीनही प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाल्याने भामरागडमधील पूरस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. या मुसळधार पुरामुळे भामरागड तालुक्यातील ५० हून अधिक गावांचा उर्वरित भागाशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे. प्रशासनाने तातडीने बचावकार्य राबवून तब्बल ५२५ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे.

**३०० घरे पाण्याखाली, आजची रात्र पुराच्या सावटाखाली**

अमरावती आणि गडचिरोलीच्या या दुर्गम भागात अनंत चतुर्दशीच्या दिवशीच पुराचे पाणी गावात शिरण्यास सुरुवात झाली. सकाळी आल्लापल्ली-भामरागड या राष्ट्रीय महामार्गावरील पर्लकोटा नदीच्या पुलावर पाणी चढल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. दुपारी १२ वाजेच्या सुमारास भामरागड गावात पुराचे पाणी शिरले. सुमारे ३०० घरे पाण्याखाली गेली असून मुख्य रस्ते जलमय झाले आहेत.

## दुष्काळ निवारणासाठी सरकारची सर्वोच्च प्राथमिकता शेतकरी, शेतमजूर आणि १२ बलुतेदारांना

**गरज भासल्यास डीपीडीसीचा निधीही दुष्काळ निवारणासाठी वळवू,अचूक पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय देणार, दुष्काळाचे राजकारण न करता सरकारसोबत सहकार्य करा : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी, शेतमजूर आणि १२ बलुतेदारांना दिलासा देण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. दुष्काळ निवारणासाठी आवश्यक ते सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मंत्रिमंडळ उपसमितीला देण्यात आले असून, गरज भासल्यास पायाभूत सुविधांच्या कामांचा निधीही दुष्काळ निवारणासाठी वळविण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, दुष्काळाची प्राथमिक दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. मंत्रिमंडळाने कॅबिनेट सब-कमिटीला पूर्ण अधिकार दिले आहेत. शासन निर्णयामध्ये आवश्यक ते बदल करण्याची वेळ आली, तरी ते निर्णय घेतले जातील. राज्याची संपूर्ण प्राथमिकता आता शेतकरी, शेतमजूर आणि १२ बलुतेदार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि १२ बलुतेदारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत घेतलेल्या या निर्णयाबद्दल मी राज्यातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**आदेश (जी आर) जारी होताच उपाययोजना सुरू**

दुष्काळ आणि टंचाईच्या परिस्थितीत मदतीसाठी प्रतीक्षा करता येत नाही. शासन निर्णय जारी झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ उपसमितीही कार्यरत झाली असून, दर मंगळवारी सायंकाळी पाच वाजता सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

ज्या जिल्ह्यात जशी परिस्थिती निर्माण होईल, त्यानुसार त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्यात येतील. पिण्याचे पाणी, चारा आणि पीक नुकसानीसह दुष्काळाशी संबंधित सर्व बाबींवर उपसमिती लक्ष ठेवणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**पिण्याच्या पाण्यासाठी जलसंधारणाला प्राधान्य**

उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आतापासूनच जिल्हानिहाय नियोजन करण्यात येत आहे. ज्या भागात पाण्याची कमतरता आहे, त्या भागात उपलब्ध जलसाठे मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांत यंदा डीपीडीसीच्या निधीतून सिमेंट रस्त्यांपेक्षा जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रिचार्ज शाफ्ट, शिवकालीन बंधारे, साठवण बंधारे, मालगुजारी तलाव यांचे बळकटीकरण तसेच जलसाठ्यांचे संवर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे. ज्या ठिकाणी पाण्याची गरज आहे, त्या ठिकाणी सिमेंट रस्त्यांपेक्षा जलसंधारणाचे साठे मजबूत करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे उपलब्ध निधी पिण्याचे पाणी आणि जलसंधारणाच्या कामांकडे वळविण्यात येत आहे, असे बावनकुळे म्हणाले.

**अचूक पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय देणार**

पीक नुकसानीचे पंचनामे करताना कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कृषी अधिकारी, तलाठी आणि ग्रामसेवक यांनी संयुक्तपणे शेतक?यांच्या उपस्थितीत पंचनामा करावा. त्यानंतर तो ग्रामसभेसमोर ठेवण्यात यावा. काही बाब राहिली असल्यास ग्रामसभेच्या माध्यमातून तिचाही समावेश करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## नागपूर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

### शासन निर्णयानुसार विविध उपाय योजना व सवलती लागू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यंदाच्या खरीप हंगामात पर्जन्याची तूट आणि इतर घटकांमुळे बाधित झालेल्या नागपूर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये प्रथम कळ अंतर्गत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील तालुक्यांमध्ये नागपूर जिल्ह्यातील नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड आणि नागपूर शहर या १४ तालुक्यांचा समावेश असून येथे उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णयानुसार या तालुक्यांसाठी जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, ७.५ हॉर्सपावरपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट आणि विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी अशा सवलती लागू करण्यात आल्या आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करणे आणि जलसंधारणाची कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशा विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या असून बाधित भागातील शेतीपिकांच्या नुकसानीबाबतची पंचनामे करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

संबंधित दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानी बाबतची मदत विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद आहे.

## मौदा येथे दुचाकीस्वराला वाचवताना मेटाडोर उलटला; १४ महिला मजूर जखमी



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा परिसरात एक भीषण रस्ता अपघात घडला आहे. दुचाकीस्वराला वाचवण्याच्या प्रयत्नात महिला मजुरांना घेऊन जाणारा मेटाडोर अनियंत्रित होऊन रस्त्यावर उलटला. या अपघातात मेटाडोरमधील १४ महिला मजूर जखमी झाल्या आहेत.भंडारा जिल्ह्यातील सुरेवाडा येथून ३० महिला मजुरांना घेऊन मेटाडोर मांगलीच्या दिशेने जात होता दरम्यान, मांगली-तेली ते सुंदरगाव मार्गावरील एका वळणावर अचानक समोरून एक दुचाकी आली दुचाकीस्वराला वाचवण्यासाठी चालक मिथुन भाविक याने मेटाडोर वळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहनावरील ताबा सुटल्याने मेटाडोर रस्त्यावरच उलटला.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मेटाडोरमध्ये अडकलेल्या महिला मजुरांना बाहेर काढले. सर्व जखमींना मौदा येथील 'ब्लेस' रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तेथे डॉ. आशिष सावरकर व त्यांच्या टीमकडून जखमींवर उपचार सुरुआहे. याप्रकरणी मौदा पोलीस पुढील तपास करत आहेत.




संपादकीय लेखणीतून...

# अण्वस्त्र निर्मूलन

आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र निर्मूलन दिन हा दिवस २६ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट जगातील सर्व अण्वस्त्रांचा पूर्णपणे नाश करून शांतता आणि सुरक्षितता निर्माण करणे आहे. अण्वस्त्रांचा धोका हा मानवी अस्तित्वासाठी सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे, आणि त्याचा वापर विनाशकारी परिणाम करू शकतो. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश अण्वस्त्रांच्या निर्मूलनासाठी जागरूकता निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला या धोक्याचा सामना करण्यासाठी एकत्र आणणे आहे. अण्वस्त्रांची शर्यत थांबवणे, या शस्त्रांच्या वाढीस प्रतिबंध करणे, आणि अण्वस्त्रविरहित जगाची उभारणी करणे हे या दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या दिवसाद्वारे अण्वस्त्रांच्या वापराचे गंभीर परिणाम लोकांसमोर आणले जातात आणि शांततापूर्ण उपाययोजनांसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले जाते. दरवर्षी २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्रांच्या संपूर्ण निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून पाळला जातो. अण्वस्त्र निर्मूलन म्हणजे काय? तर जगातून सर्व अण्वस्त्रे- अणुबॉम्ब आणि घातक आण्विक शस्त्रास्त्रे पूर्णपणे नष्ट करणे म्हणजेच अण्वस्त्र निर्मूलन होय. १) मानवी जीवितहानी, २) पर्यावरणाचा विनाश आणि ३) जागतिक सुरक्षा धोक्यात येऊ नये. म्हणून संयुक्त राष्ट्र- युएन व विविध देश निःशस्त्रीकरणाचा प्रचार करतात.

पार्श्वभूमी आणि इतिहास : संयुक्त राष्ट्रांनी सन २०१३ मध्ये ठराव मंजूर करून २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्र निर्मूलन दिन म्हणून घोषित केला. सन १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या भीषण परिणामानंतर जगात अण्वस्त्रांविरोधात मोठी जाणीव निर्माण झाली. सद्यस्थितीत जागतिक अण्वस्त्र साठा असा- जगात सध्या ९ देशांकडे अण्वस्त्रे आहेत. रशिया आणि अमेरिका यांच्याकडे जगातील सर्वाधिक सुमारे ८६% अण्वस्त्रे आहेत. भारताकडे सुमारे १९० अण्वस्त्रे असून भारताचे धोरण "आधी अण्वस्त्र वापरणार नाही

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अणुयुगाचा प्रारंभ झाला, जेव्हा अनेक देशांनी अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू केली. सुरुवातीला, शीतयुद्धाच्या भू-राजकारणाच्या परस्परपूरक संदर्भात आणि प्रभावी आंतरराष्ट्रीय निःशस्त्रीकरण धोरणांच्या अभावामुळे, अमेरिका, सोव्हिएत संघ, युनायटेड किंगडम, फ्रान्स आणि चीनसारखे देश सन १९४५-६४ दरम्यान "अण्वस्त्रधारी शक्ती" बनले. कॅट्झ २००८ ; शेंक आणि युमन्स २०१२ या काळात जगभरातील सर्व वातावरणांमध्ये- वातावरण, जमिनीखाली आणि पाण्याखाली मोठ्या संख्येने अणुचाचण्या घेण्यात आल्या. याच काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघाने वातावरणात मोठ्या संख्येने अणुचाचण्या केल्या. याची सर्वात प्रातिनिधिक उदाहरणे म्हणजे सन १९५४ मध्ये अमेरिकेने मार्शल बेटांवरील बिकिनी प्रवाळद्वीपावर कॅसल ब्राव्हो चाचणी आणि सन १९६१ मध्ये सोव्हिएत संघाने उरल पर्वतांच्या उत्तरेकडील नोव्हाया झेम्लिया द्वीपसमूहात सत्सार चाचणी केलेले हायड्रोजन बॉम्बचे पहिले अणुस्फोट- गुडबी २००५ घडविले. वातावरणात आतापर्यंत झालेल्या सर्वात शक्तिशाली अणुचाचण्यांमुळे झालेले गंभीर पर्यावरणीय नुकसान, तसेच जागतिक अणुशस्त्र चाचण्यांच्या सर्वसाधारण पार्श्वभूमीने, अणुशस्त्र चाचण्या पूर्णपणे बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या पहिल्या टप्प्यासाठी पाया तयार केला आहे. अशाप्रकारे सन १९६३ हे वर्ष मर्यादित चाचणी बंदी कराराच्या- एलटीबीटी अंमलात येण्याने एक महत्त्वाचा टप्पा ठरले. या करारानुसार भूमिगत भाग वगळता जगातील सर्व वातावरणात अणुशस्त्र चाचण्यांवर बंदी घालण्यात आली होती - रुबिन्सन २०११. जरी फ्रान्स आणि चीन या दोन प्रमुख देशांनी या करारावर स्वाक्षरी केली नसली तरी- मास्टनी २००८, कारण या देशांनी वातावरणात त्यांच्या अणुशस्त्र चाचण्या सुरूच ठेवल्या होत्या, तरीही सन १९६३ पासून दोन्ही गोलार्धांतील वातावरणातील किरणोत्सर्गी समस्थानिकांना मर्यादित ठेवण्यात या कराराचा खरा प्रभाव पडला-लेविन इत्यादी तसेच मॅनिंग आणि मेलहुइश १९९४.

सन १९६८ मध्ये अण्वस्त्र प्रसारबंदी करार- एनपीटी लागू होणे, ज्याने पाच विद्यमान अणुशक्ती असलेल्या देशांना वगळून जगातील सर्व देशांना अण्वस्त्रधारी बनण्यावर बंदी घातली, अण्वस्त्रांची स्पर्धा आणि अप्रत्यक्षपणे अण्वस्त्र चाचण्या संपवण्याच्या प्रयत्नांमधील हा आणखी एक महत्त्वाचा क्षण होता- व्हॅन डर मीर २०११. जरी या करारातील तरतुदींची अंमलबजावणी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या- आईएईए मदतीने होणार होती- वेट्झ २०११, तरी गेल्या चार दशकांतील भू-राजकीय अनुभवांनी हे दाखवून दिले आहे की एनपीटीच्या कक्षेबाहेर, भारत, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, उत्तर कोरिया आणि वरवर पाहता इस्त्रायल- अनिर्दिष्ट अणुस्थिती यांचा समावेश असलेल्या अण्वस्त्रधारी देशांची एक वेगळी श्रेणी उदयास आली आहे- मॅकडोनेल २०१३ आणि यापैकी काही देश स्वतःच्या अण्वस्त्र चाचण्या घेतच आहेत. सन १९९६ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार- सीटीबीटी १९९६ स्वीकारल्याने, सर्व प्रकारच्या अणुचाचण्या थांबवण्याच्या एका नवीन पर्वाची सुरुवात झाली. तथापि १९४५ ते २०१३ या काळात वातावरणात आणि जमिनीखाली मोठ्या संख्येने केलेल्या अणुचाचण्या जशी शेवटची अणुचाचणी उत्तर कोरियाने केली होती, त्यांच्या किरणोत्सर्गी कचऱ्यामुळे सध्याचे पर्यावरणाचे प्रदूषण झाले आहे, ज्यामुळे किरणोत्सर्गाच्या उच्च पातळीमुळे अनेक स्थळे पर्यावरणीय आणि सामाजिकदृष्ट्या उद्धवस्त झाली आहेत. प्रस्तुत अभ्यास हा अणुबॉम्ब चाचण्यांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांच्या विश्लेषणावर आधारित असून, त्यात प्रामुख्याने जागतिक आणि प्रादेशिक संदर्भांतील वातावरणीय व सागरी पर्यावरणीय प्रदूषणाच्या मुद्द्यावर, तसेच किरणोत्सर्गी प्रदूषणामुळे मानवावर होणाऱ्या परिणामांसंबंधीच्या विशिष्ट बाबींवरील चर्चा आहे.

अण्वस्त्र निर्मूलन किंवा निःशस्त्रीकरणाचा अर्थ जगातल्या विनाशाची भीती निर्माण करणाऱ्या अण्वस्त्रांची संख्या पूर्णपणे संपवणे किंवा कमी करणे हा आहे. अण्वस्त्रांच्या संपूर्ण निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस हा दरवर्षी २६ सप्टेंबर रोजी पाळला जातो. जगातून अणुयुद्धाचा धोका संपवणे आणि जागतिक शांतता प्रस्थापित करणे. जगभरात अमेरिका, रशिया, चीन, भारत, पाकिस्तान यांसारख्या मोजक्या देशांकडे अण्वस्त्रे आहेत. रशिया आणि अमेरिकेकडे सर्वाधिक अण्वस्त्रसाठा आहे. अणुबॉम्बच्या एका स्फोटाने लाखो लोकांचा जीव जातो आणि पुढच्या पिढ्यांवरही घातक परिणाम होतात. पर्यावरणाचा नाश होतो आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टी धोक्यात येते.

# निवडणूक आयोग निष्पक्ष, तरच देश सुरक्षित !

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय निवडणूक आयोग हा आपल्या लोकशाहीचा कणा आहे. भारतासारख्या प्रचंड आणि विविधतेने नटलेल्या देशात निवडणुका शांततेत, पारदर्शक आणि मुक्त वातावरणात पार पाडणे ही केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया नाही, तर ती देशाच्या सुरक्षेची आणि स्थैर्याची गुरुकिल्ली आहे. यासाठी निवडणूक आयोगाला तटस्थ व निःपक्ष राहुल कार्य करण्याची गरज आहे,परंतु सध्य स्थितीत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर उठणारे प्रश्न चिंताजनक आहे. स्वतंत्र आणि स्वायत्त निवडणूक आयोग ही केवळ घटनात्मक गरज नसून देशाची शांतता, प्रगती आणि सुरक्षितता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली पूर्वअट आहे.

भारतीय निवडणूक आयोग ही देशातील लोकशाहीचा कणा मानली जाते. परंतु, अलिकडच्या काही वर्षांत निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर, पारदर्शकतेवर आणि निर्णय घेण्याच्या पद्धतींवर विविध राजकीय पक्ष, नागरी समाज आणि सर्वोच्च न्यायालयाकडूनही प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहेत. निवडणूक आयोगाच्या कामकाजात सुधारणा करून त्याच्या कथित 'मनमानी' पद्धतीला चाप लावणे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आवश्यक मानले जात आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले असून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर इतर दोन निवडणूक आयुक्तांनी गंभीर आक्षेप घेतल्याचे समोर आले आहे. मतदार यादीच्या विशेष सघन पुनरिक्षण प्रक्रियेवरून हे मतभेद उफाळून आले आहेत. 'द इंडियन एक्सप्रेस'च्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या एकतर्फी निर्णयांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही संपूर्ण देशाच्या लोकशाहीचा पाया असते. त्यामुळे तेथील मतभेद चव्हाट्यावर येणे चिंतेची बाब मानली जाते.

यापूर्वी निवडणूक आयुक्तांची नियुक्ती पूर्णपणे केंद्र सरकारच्या शिफारशीवरून राष्ट्रपतींद्वारे केली जात असे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली, परंतु नवीन कायद्यानुसार या समितीत पंतप्रधान, त्यांनी नियुक्त केलेले एक केंद्रीय मंत्री आणि लोकसभा विरोधी पक्षनेते यांचा समावेश असतो.या समितीत सत्ताधारी पक्षाचे बहुमतअसल्याने, सरकार आपल्या आवडीच्या व्यक्तीची निवड करू शकते, असा आक्षेप विरोधी पक्षांनी घेतला आहे. खरा वाद इथेच आहे.आयोगाला पूर्णपणे निष्पक्ष ठेवण्यासाठी या समितीत भारताचे सरन्यायाधीश असावेत, अशी मागणी सातत्याने केली जाते.

निवडणूक आयोगावर अनेकदा असा आरोप केला जातो की, आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल विरोधी पक्षांच्या नेत्यांवर त्वरित आणि कडक कारवाई केली जाते, तर सत्ताधारी पक्षाच्या बड्या नेत्यांच्या प्रक्षोभक भाषणांकडे किंवा नियमांच्या उल्लंघनाकडे दुर्लक्ष केले जाते किंवा केवळ नोटीस देऊन सोडले जाते. आयोग काही प्रकरणांमध्ये कारवाई का करत नाही किंवा निर्णय घेण्यास विलंब का लावतो, याचे कोणतेही स्पष्ट कारण जनतेसमोर येत नाही.

सध्या निवडणूक आयोगात एक अधिकार शाही विरोधात जो अंतर्गत वाद उफाळून आला त्यामुळे आयोगाच्या विश्वसनीय तेवर प्रश्न उपस्थित होत आहे. निवडणूक आयोग त्रिस्तरीय असला तरी निर्णय मुख्य निवडणूक आयुक्त घेत असल्याचा आरोप दोन निवडणूक आयुक्तांनी केला आहे. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि निर्णयावर दहा महिन्यात चौदा वेळा लेखी गंभीर आक्षेप घेतल्याचा खुलासा सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी केला आहे.

अनेक महत्त्वाचे निर्णय आपल्याला पूर्णपणे अंधारात ठेवून घेण्यात आल्याचा दावा संधू आणि जोशी यांनी केला आहे देशातील ३० राज्य व केंद्रशासित प्रदेशात राबवलेल्या एसआयआर मोहिमे अंतर्गत १३ कोटी होऊन अधिक मतदारांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली किंवा बदलण्यात आली आहे या अत्यंत महत्त्वाच्या प्रक्रियेत आपल्याला विश्वासात घेतले गेले नाही असा आक्षेप दोन्ही आयुक्तांनी केला आहे. हा आरोप अतिशय गंभीर असून लोकशाहीशी विसंगत अशा प्रकारचा हा आरोप आहे.

निवडणूक आयोगात याआधी देखील वाद झालेले आहेत २००९ मध्ये तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त एन गोपाळ स्वामी यांनी सहकारी निवडणूक आयुक्त नवीन चावला यांच्या पक्षपाती वर्तनावरून त्यांना पदावरून हटविण्याची शिफारस केली होती. १९९३-९५या काळात तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी एन सेशन यांनी बहु सदस्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेला आव्हान देत न्यायालयात धाव घेतली होती त्यातून सहकारी निवडणूक आयुक्त एम एस गिल आणि जी व्ही जी कृष्णमूर्ती यांच्यासमोर न्यायालयीन लढाई झाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान तत्कालीन निवडणूक आयुक्त अशोक लवासा यांनी आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या प्रकरणात भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना देण्यात आलेल्या क्लीन चीट बाबत असमती व्यक्त केली होती.

कायदेशीर आणि घटनात्मक दृष्टिकोनातून, निवडणूक आयोगात मतभेद असणे आणि ते अधिकृत नोंदींमध्ये असणे पूर्णपणे वैध आहे. परंतु, हे मतभेद जेव्हा सार्वजनिक वादाचे रूप घेतात, तेव्हा संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहोचू नये याची काळजी घेणे आवश्यक असते.

निवडणूक आयोगावर देशातील निवडणुका निष्पक्ष आणि मुक्त वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी असते. अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्यास जनतेचा आणि राजकीय पक्षांचा आयोगाच्या निष्पक्षतेवरील विश्वास कमी होऊ शकतो.आयोगातील अंतर्गत मतभेदांचा राजकीय पक्षांकडून आपल्या फायद्यासाठी वापर केला जाऊ शकतो. पराभूत होणारा पक्ष निवडणुकांच्या निकालांवर संशय घेण्यासाठी या वादाचा आधार घेऊ शकतो, ज्यामुळे लोकशाही प्रक्रियेला धक्का पोहोचतो निवडणूक आयोगाने एकजूट दाखवणे अपेक्षित असते. अंतर्गत वाद कायदेशीर आणि अधिकृत माध्यमातून (उदा. निवडणूक निकालांच्या नोंदींमध्ये किंवा कोर्टात) मांडण्याऐवजी ते माध्यमांमध्ये चव्हाट्यावर येणे संस्थेच्या प्रतिष्ठेला साजेसे नसते.

निवडणूक आयुक्तांमध्ये मतभेद असणे हे लोकशाहीशी पूर्णपणे सुसंगत आहे, कारण लोकशाहीत विविध विचारांना स्थान असते परंतु, ते मतभेद ज्या पद्धतीने चव्हाट्यावर येतात, ती पद्धत सुसंगत की विसंगत हे ठरवते. जर मतभेद घटनात्मक चौकटीत आणि अधिकृत नोंदींद्वारे समोर आले तर ती पारदर्शकता ठरते; मात्र ते वैयक्तिक वाद किंवा अंतर्गत राजकारणाचे रूप घेऊन समोर आले, तर ते लोकशाहीच्या आरोग्यासाठी विसंगत ठरू शकते.

काही तज्ज्ञांच्या मते, निर्णय प्रक्रियेतील मतभेद समोर येणे हे अंतर्गत लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे. छुप्या पद्धतीने घेतलेल्या निर्णयांपेक्षा मतभेद जाहीर होणे अधिक पारदर्शक असते.एकसुरीपणाला आळा निवडणूक आयोग ही बहु-सदस्यी संस्था आहे. सर्व निर्णय एकाच व्यक्तीच्या मर्जीने न होता, सर्व सदस्यांच्या सहमतीने किंवा बहुमताने व्हावेत, हाच यामागचा उद्देश आहे. मतभेद समोर येणे म्हणजे तिथे वैचारिक स्वातंत्र्य आहे हे सिद्ध होते. थोडक्यात सांगायचे तर, निवडणूक आयोगामध्ये अंतर्गत चर्चांमध्ये मतभेद असणे आणि वेगवेगळ्या विचारांना वाव असणे हे लोकशाहीशी सुसंगत आहे. मात्र, हे मतभेद चव्हाट्यावर येणे आणि त्यामुळे संस्थेच्या कामात अडथळा निर्माण होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी विसंगत ठरते.

लोकशाहीची पाळेमुळे घट्ट ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाने पूर्णपणे निष्पक्ष, स्वतंत्र आणि पारदर्शक राहून कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. भारताच्या संविधानाने कलम ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाला एक स्वायत्त आणि स्वतंत्र संस्था म्हणून अधिकार दिले आहेत, जेणेकरून देशात भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पडू शकतील.

निवडणूक आयोग ही देशातील सर्वात महत्त्वाची संस्था आहे. तिची स्वायत्तता आणि निष्पक्षता अबाधित राखणे हे देशाच्या निरोगी लोकशाहीसाठी अत्यंत गरजेचे आहे. थोडक्यात सांगायचे तर, निवडणूक आयोग हा लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा रक्षक आहे. त्यामुळे त्याचे कार्य कोणत्याही एका बाजूने झुकलेले न दिसता पूर्णपणे तटस्थ आणि न्याय्य असणे हे देशाच्या हितासाठी आवश्यक आहे.

- ९५६१५९४३०६

# मोदी देशाला एकविस वर्ष पुढे नेतोय की मागे गमन करायला लावतोय

सुनील शिरपुरे
यवतमाळ

एकीकडे भारत सरकारने देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने म्हणजेच २०४७ पर्यंत भारताला एक 'विकसित राष्ट्र' नावाचा एक भव्य आणि दूरगामी महत्त्वाकांक्षी महाप्लॅन आखला आहे. या महायोजनेला 'विकसित भारत २०४७' किंवा 'व्हिजन इंडिया २०४७' असे नाव देण्यात आले आहे, ज्याची संपूर्ण धुरा नीती आयोगाकडे सोपवण्यात आली आहे. नीती आयोगाच्या समन्वयाने तयार करण्यात आलेल्या या व्हिजन डॉक्युमेंटचा मुख्य उद्देश भारताला आर्थिक सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या जगातील आघाडीच्या देशांमध्ये समाविष्ट करण्यासाठी भारताला गरिबीतून पूर्णपणे बाहेर काढून एक शक्तीशाली, आत्मनिर्भर आणि समृध्द देश बनवणे आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाचे वार्षिक सरासरी उत्पन्न वाढवून ते सुमारे १८,००० ते २०,००० म्हणजेच अंदाजे १५ ते १६ लाख रुपये पर्यंत नेण्याचा प्रयत्न आणि देशातून बहुआयामी गरिबी पूर्णपणे नष्ट करून 'झिरो पॉव्हर्टी' चे लक्ष्य गाठणे आहे.

या संपूर्ण मास्टर प्लॅनची विभागणी ४ प्रमुख स्तंभांवर करण्यात आली आहे. तरुणांना नाविन्यपूर्ण संशोधन, स्टार्टअप्स आणि रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध करून देणे. सर्वांना पक्के घर, अन्न, शुद्ध पाणी, आरोग्य आणि आर्थिक समावेशकतेच्या माध्यमातून गरिबांचे जीवनमान उंचावणे. महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला चालना देणे आणि देशाच्या आर्थिक व्यवस्थेत महिलांचा सहभाग ७०% पर्यंत वाढवून महिला सक्षमीकरण करणे नि तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पन्न वाढवणे आणि भारताला जगाचे 'अन्नपात्र' बनवणे असा आहे.

मध्यंतरी काळा पैसा बाहेर काढण्याच्या व डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने २०१६ मध्ये नोटबंदी झाली. नोटबंदीनंतर देशात डिजिटल व्यवहारांना मोठा वेग मिळाला व युपीआय अत्यंत लोकप्रिय झाले. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारत सरकारने ५०० आणि १००० रुपयांच्या जुन्या नोटा अचानक रद्द केल्या, ज्यामुळे देशभरात तीव्र रोख रकमेचा तुटवडा निर्माण होऊन नागरिकांची मोठी हेळसांड झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबरच्या रात्री ५०० आणि १००० च्या नोटा बेकायदेशीर ठरवत असल्याचे जाहीर केले. हे प्रमाण एकूण चलनाच्या ८६.५ टक्के होते. त्यानंतर कोरोना महामारीच्या काळात भारतातील युपीआय व्यवहारांमध्ये अभूतपूर्व आणि ऐतिहासिक क्रांती पाहायला मिळाली. लॉकडाऊन आणि सोशल डिस्टन्सिंगच्या काळात रोख पैशांच्या देवाणघेवाणीतून कोरोना संसर्ग पसरण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे करोडो भारतीयांनी कॉन्टॅक्टलेस' (स्पर्शरहित) पेमेंट म्हणून डिजिटल पेमेंटला पसंती दिली. यामुळे पूर्वी संथ गतीने चालणाऱ्या डिजिटल व्यवहारांना अचानक मोठी गती मिळाली आणि युपीआय भारताच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा बनला. नोटबंदीने भारतात डिजिटल व्यवहारांची सुरुवात केली असली, तरी कोरोना महामारीने सामान्य भारतीयांच्या जीवनशैलीत युपीआयला कायमचे स्थान मिळवून दिले. आज भारत हा जगातील सर्वात मोठ्या डिजिटल पेमेंट अर्थव्यवस्थेपैकी एक बनला आहे, ज्याची मुख्य पायाभरणी कोरोना काळातच झाली.

कोरोना काळ हा भारताच्या डिजिटल क्रांतीसाठी विशेषतः युपीआय व्यवहारांसाठी एक अत्यंत मोठा टर्निंग पॉईंट ठरला. या साथीच्या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने भारतात डिजिटल पेमेंट क्रांतीला प्रचंड गती दिली आणि रोख व्यवहारांवर चालणारा भारत देश झपाट्याने 'कॅशलेस' व्यवस्थेकडे वळला. त्यामुळे युपीआय पेमेंट हे भारतीयांसाठी जीवनवाहिनी ठरली. कोरोना प्रतिबंधक लसीकरणाच्या मोहिमेतही पेमेंट सुलभ करण्यासाठी सरकारने डिजिटल व्हाउचरचा वापर केला. गुगल पे सारख्या कंपन्यांनी यासाठी युपीआय व्हाउचर ही विशेष सुविधा सुरु केली, ज्यामुळे बँक खाते लिंक नसलेले नागरिकही प्रीपेड व्हाउचरद्वारे सहज व्यवहार करू शकत होते. कोरोना संकटाने भारतीयांच्या जीवनशैलीत मोठा बदल घडवून आणला आणि जी डिजिटल क्रांती होण्यासाठी कदाचित दशक लागले असते, ती क्रांती युपीआयमुळे अवघ्या १-२ वर्षांत घडून आली. आज भारत जागतिक स्तरावर रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांमध्ये आघाडीवर असण्यामागे कोरोना काळातील या डिजिटल बदलाचा मोठा वाटा आहे.

भारत आज युपीआय पेमेंटच्या बाबतीत जगात अव्वल स्थानावर आहे. भाजीवाल्यापासून ते मोठ्या मॉल्सपर्यंत प्रत्येक ठिकाणी एका सेकंदात होणाऱ्या या क्रांतीने भारतीयांचे जीवन जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात वेगाने वाढणा-या डिजिटल पेमेंट सिस्टीममध्ये भारताचा युपीआय अग्रस्थानी आहे. आता केवळ भारतातच नाही, तर सिंगापूर, युएई, फ्रान्स, श्रीलंका, मॉरिशस आणि नेपाळ यांसारख्या अनेक देशांमध्येही भारताचे युपीआय पेमेंट स्वीकारले जात आहे. सर्वसामान्यांसाठी खिशातून पाकीट गायब झाले आणि सुट्या पैशांचे टेन्शन पूर्णपणे मिटले आहे. अगदी १ रुपयापासून ते हजारांपर्यंतचे पेमेंट क्यूआर कोड स्कॅन करून सहज होते. एटीएम शोधणे किंवा बँकेच्या रांगेत उभे राहण्याची गरज आता राहिलेली नाही. सुरक्षित सर्व्हर आणि 'टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन' मुळे व्यवहार सेकंदाच्या आत आणि सुरक्षित पूर्ण होतात. आता युपीआय लाईट आणि इंटरनेट नसतानाही पेमेंट करण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे.

**सत्ताधारी पक्ष सरकार चालविण्यास असमर्थ**

डिजिटल इंडिया म्हणत सरकारने लोकांना युपीआयची सवय लावली आता त्यावर ज्यादाचे पैसे आकारले जाणार आहेत? हा तर सरकारचा यु-टर्न आहे. एकीकडे डिजिटल इंडियाचा ढोल बडवायचा आणि दुसरीकडे डिजिटल व्यवहारांचा खर्च वाढवायचा. युपीआय नेटवर्कचा वाढता विस्तार आणि बँकांचा पायाभूत खर्च पाहता नुकतेच केंद्र सरकारने नव्या नियमांतर्गत २,००० रुपये पर्यंतचे मर्चंट व्यवहार आणि सर्व पर्सन-टू-पर्सन व्यवहार पूर्णपणे मोफत ठेवले असले, तरी २,००० रुपयांपेक्षा जास्त मोठ्या व्यावसायिक व्यवहारांवर व्यापाऱ्यांसाठी अंशतः शुल्क लागू केले आहे. बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादार कंपन्यांचा युक्तीवाद आहे की, मोफत युपीआय सेवा देण्यासाठी त्यांना पायाभूत सुविधांवर मोठा खर्च करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण पडत आहे. नोटबंदी असेल किंवा डिजिटल पेमेंट व्यवहार असतील यात सरकारचे हेतू कधीच स्वच्छ नव्हते.

युपीआय चालवण्याचा खर्च कोण करणार? याचा विचार व्यवस्था उभी करतानाच व्हायला हवा होता. जो केला नाही किंवा करायचा नाही असं आधीच ठरलं होतं. २०२२ ला अर्थ खात्याने असं स्पष्ट सांगितलं होतं. पण हे सांगताना कधी जनतेच्या खिशात हात घालायचा हे पण ठरलं होतं आणि दोन माणसांच्या व्यवहारांवर शुल्क लावत नाही असले भंपक युक्तिवाद सरकारने करू नये. आपल्या युक्तिवादाने 'डिजिटल सापळा' लावला आहे आणि त्यात प्रत्येक भारतीय आता अडकला आहे.

केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' अर्थात युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर 'डिजिटल सापळा' लावला आहे. आधी नोटबंदी करून आम्ही कसं डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजावाजा करत स्वतःची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली आणि आता अचानक घोषित करून टाकलं की या व्यवहारांवर शुल्क लागेल. म्हणजेच नागरिकांना गुंगवत ठेवलं आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडलं. सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली. तिला प्रतिसाद मिळेल असं बघितलं आणि तिला प्रतिसादही मिळाला.

जर डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करणं इतका स्वच्छ हेतू होता, तर ज्या दिवशी या पेमेंटच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक केली तेव्हाच ती चालत राहावी आणि सामान्य माणसांच्या खिशाला झटका बसू नये म्हणून तरतूद का केली नाही? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो यासाठी पैसा लागणार हे माहित असताना त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायम स्वरूपी का बरं केली नाही? सरकारचं म्हणणं आहे की हा भार व्यापाऱ्यांनी सोसायचा. काय खात्री आहे की व्यापारी हा भार सोसतील आणि ग्राहकांच्या माथी तो मारणार नाहीत? यासाठी काही यंत्रणा सरकारकडे आहे का? सांगायचं तात्पर्य म्हणजे सरकार जमेल तिथून नागरिकांच्या खिशात हात घालत आहेत. पंतप्रधान मोदी परदेशात जाऊन युपीआयची जाहिरातबाजी करायचे आणि स्वतःची पाठ थोपटवून घ्यायचे, आता परत जेव्हा परदेशात जातील तेव्हा मी कसा एमडीआर आणि जीएसटी लावला हे पण हसून हसून सांगणार नाही का?

एकीकडे वाढत्या महागाईने जनता त्रस्त असताना दुसरीकडे सरकारने युपीआय पेमेंटवर कर आकारून जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार केला आहे. एकीकडे कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देताना, दुसरीकडे युपीआय शुल्काची होणारी चर्चा किंवा अमलबजावणी हा सध्याचा एक ज्वलंत वादग्रस्त विषय आहे. भारत सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेत युपीआयला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविले. मात्र, आता त्यावर शुल्क आकारण्याच्या मुद्द्यावरून ग्राहक आणि व्यापारी यांच्यात चिंतेचे वातावरण आहे. शुल्काबाबतच्या झळकणा-या बातम्यांच्या उधाणांमुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सरकारचे एकंदरीत उपक्रम, प्रत्येक वस्तूंवरील वाढता दर, त्यावर लावला जाणारा कर आणि इतर एकूण बाबींचा विचार करता सरकार प्रत्येक पाऊलांवर जनतेच्या खिशात हात घालण्याचं आणि मोठ्या उद्योजकांचा घसा भरण्याचंच काम करत असल्याचं दिसून येत आहे.

- ७४९८८८५०६१

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ओसीजीसीने आंतरराष्ट्रीय ब्रँड विकसित करावा : गडकरी

## ऑरेंज सिटी गारमेंट क्लस्टरचा दशकपूर्ती सोहळा उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ओसीजीसीने गेल्या दहा वर्षांत मिळविलेल्या अनुभवाच्या बळावर आता जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करू शकेल असा स्वतःचा आंतरराष्ट्रीय ब्रँड विकसित करावा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. उत्पादनाची गुणवत्ता, विश्वासार्हता, सातत्य, नावीन्य आणि मूल्यवर्धन यावर भर देऊन ओसीजीसीने जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करावी, असे त्यांनी सांगितले.

कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या ऑरेंज सिटी गारमेंट क्लस्टर प्रायव्हेट लिमिटेड (ओसीजीसी), नागपूरचा दशकपूर्ती सोहळा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

विदर्भात कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात होते आणि या प्रदेशात वस्त्रोद्योग व गारमेंट क्षेत्राच्या विकासाची मोठी क्षमता आहे, असे गडकरी यांनी सांगितले. विदभार्तील मोठ्या प्रमाणातील कच्चा कापूस बाहेर पाठविला जातो आणि त्याचे मूल्यवर्धित तयार उत्पादन देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचते. त्यामुळे कापसावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून गारमेंट उत्पादनाला चालना दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासोबतच मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मितीच्या क्षेत्रात ओसीजीसीने केलेल्या कामाचे गडकरी यांनी कौतुक केले. ओसीजीसीने आतापर्यंत ६,८०० हून अधिक महिलांना विशेषतः वंचित घटकातील महिलांना प्रशिक्षण व रोजगार दिल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

कोरोना महामारीच्या काळात ओसीजीसीने दिलेल्या योगदानाचाही गडकरी यांनी विशेष उल्लेख केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ओसीजीसीने पीपीई किट्सची निर्मिती केली होती. महामारीच्या काळात देशाला आवश्यक असलेल्या संरक्षणात्मक साधनांची गरज भागविण्यास या उत्पादनाचा हातभार लागला.

ओसीजीसीचे प्रवर्तक विपुल पंचमटिया, नीरज सेठी, चंदीर खेमचंदानी आणि सुबोध झुनझुनवाला यांनी नितीन गडकरी आणि गिरिराज सिंह यांचे स्वागत केले. ओसीजीसीची स्थापना मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस-क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम (टरए-उउढ) अंतर्गत झाली असून, गिरिराज सिंह हे केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री असताना हा क्लस्टर कार्यान्वित झाला होता, अशी माहिती प्रवर्तकांनी दिली. क्लस्टरच्या स्थापनेच्या वेळी केंद्रीय मंत्री म्हणून मार्गदर्शन करणारे गिरिराज सिंह दहा वर्षांनंतर दशकपूर्ती सोहळ्यात पुन्हा सहभागी झाले, हा आपल्यासाठी विशेष आनंदाचा क्षण असल्याचे प्रवर्तकांनी सांगितले.

दशकपूर्ती सोहळ्यात स्थापनेपासून ओसीजीसीशी जोडलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. गडकरी यांनी ओसीजीसीमध्ये दहा वर्षांपूर्वी रुजू झालेल्या पहिल्या महिला कर्मचाऱ्याचा विशेष सत्कार केला. तसेच पाच वर्षांच्या सेवाकाळात एकही रजा न घेता उल्लेखनीय समर्पणाने काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याचाही गौरव करण्यात आला.

**निर्यातक्षम दर्जाची उत्पादने तयार करा : गिरिराज सिंह**

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांनी ओसीजीसीच्या दशकपूर्तीबद्दल अभिनंदन करत वस्त्रोद्योग व गारमेंट क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. भारतीय कंपन्यांनी जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारे ब्रँड विकसित करावेत आणि आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानकांनुसार उत्पादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. भारताचा जागतिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील वाटा अधिक मजबूत करण्यासाठी निर्यातक्षम दर्जाचे उत्पादन, नावीन्य, ब्रँडिंग आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर उद्योगाने भर देण्याची गरज असल्याचे सिंह यांनी सांगितले.

## समर्थ रामदास हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश



**दै. सिंहवाणी वृत्त, शुभम कामळे - काचुरवाही**
तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत अरोली येथील समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले. मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी भवन एन.टी.पी.सी., मौदा येथे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये नाभेश साहारे याने ६०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर पूर्वी मधुरकर हिने ४०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये श्लोक मेहर याने ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. शिवम बावनकुळे याने गोळाफेक व भालाफेक या दोन्ही क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक मिळविला. निर्भय मेहर याने ८०० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक मिळविला. याच वयोगटातील मुलींमध्ये निशा मथुरे हिने गोळाफेकमध्ये द्वितीय, तर आरोषी पिसे हिने ४०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. १९ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये कमलेश हटवार याने ३००० मीटर व ८०० मीटर या दोन्ही प्रकारांत द्वितीय क्रमांक मिळविला. अनुग्रह डाहाके याने २०० मीटरमध्ये प्रथम, तसेच ४०० मीटर व १५०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. यश मथुरे याने ८०० मीटरमध्ये प्रथम व लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक, तर हितेश भिवगडे याने लांब उडीमध्ये प्रथम व २०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. शिवाजीराव कुंभलकर, संस्थासचिव मा. नंदाताई घटे, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अनिकेत कुंभलकर तसेच प्राचार्य सुनील बडवाईक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मेडल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्राचार्य सुनील बडवाईक, पर्यवेक्षक केशव डोकरीमारे, क्रीडा शिक्षक सुधीर पोटभरे तसेच सहाय्यक शिक्षिका उषा कौरती यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तालुकास्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## महात्मा फुले शिक्षण संस्थेत सत्यशोधक समाज वर्धापन दिन साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महात्मा जोतिराव फुले जयंती द्विशताब्दी वर्षानिमित्य रेशीमबाग येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेत २४ सप्टेंबरला सत्यशोधक समाज वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

मानवता हाच खरा धर्म, सत्याने वतार्वा जोती म्हणे, असें सांगणारे क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या पुतळ्यांना संस्थेचे आजीवन सदस्य प्रभाकर येवले व संचालिका शोभा लेकुरवाळे यांनी माल्यार्पण करून उपस्थितीतांनी मानवंदना दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान संस्थेचे अध्यक्ष, प्रा. अरुण पवार यांनी भूषविले तर प्रमुख वक्ता म्हणून शैल जेमिनी यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून बोलतांना महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज स्थापनेमागील भूमिका स्पस्ट केली, महात्मा फुलेचे सामाजिक कार्य, विचार प्रणाली मांडली.

अध्यक्षीय भाषणात प्रा. अरुण पवार यांनी महात्मा फुले जयंती द्विशताब्दी वर्षानिमित्य संस्थेद्वारे वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येतं आहे याबद्दल माहिती दिली, तसेंच जयंती द्विशताब्दी वर्षांमध्ये अनेक कार्यक्रम गावोगावी, शहरात उत्साहात साजरा करावा यासाठी मार्गदर्शन केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर स्वलिखित "प्रबुध्द भारत "वृतपत्राचा प्रती संस्थेतर्फे बहुजन समाजात वाटप करण्याचा मानस व्यक्त केला.

यावेळी ज्ञानेश्वर रक्षक, बाबा बिडकर व उमेश कोराम यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन संस्थेचे संचालक प्रा.डॉ.अभिजित पोतले तर आभार संचालक राजेंद्र पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष प्रकाश देवते,उपाध्यक्ष गुलाब चिचाटे, सरचिटणीस रवींद्र अंबाडकर, सह चिटणीस रमेश राऊत, संचालक सुनील चिमोटे,नंदू कण्हेर, प्रा पंकज कुरळकर, देवेंद्र काटे संचालिका अलका झाडे व मोठया प्रमाणात समाज बांधव-भगिनी उपस्थित होते.

## सरपंच धम्मजीत गजभिये यांची महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेच्या नागपूर जिल्हाध्यक्षपदी निवड व नियुक्ती

### सरपंच संघटना, मौदा तालुकाध्यक्ष ग्रामपंचायत तुमानचे सरपंच

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
सरपंच संघटना मौदा तालुकाध्यक्ष ग्रामपंचायत तुमान सरपंच धम्मजीत गजभिये यांची महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेचे नागपूर जिल्हाध्यक्षपदी महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना प्रदेशाध्यक्ष प्रा. राजेंद्र कराळे यांनी २३ सप्टेंबरला निवड व नियुक्ती केली.

सरपंच धम्मजीत गजभिये यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याच्या अनुभव तसेच ग्रामपंचायत स्तरावरील कायाची दखल घेऊन संघटनेने जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष यांनी नागपूर जिल्ह्यातील सरपंच व ग्रामपंचायत प्रतिनिधींना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना




व न्याय मागण्यांना प्रभावीपणे मांडण्यासाठी संघटनेच्या ध्येयधोरणानुसार कार्य करावे, अपेक्षा सरपंच धम्मजीत गजभिये यांना नियुक्तीपत्र देताना, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक राजेंद्र कराळे यांनी व्यक्त केली आहे.

नियुक्ती झाल्याच्या मागील सात दिवसापासून सरपंच धम्मजीत गजभिये यांच्यावर तालुक्यातील सरपंच मंडळीकडून व त्यांच्या मित्र परिवाराकडून पुष्पगुच्छ देऊन, मनापासून सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. शुभेच्छा देणाऱ्यांमध्ये महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना विदर्भ अध्यक्ष देवा पाचभाई, शिक्षक अभय गणोरकर, शिक्षक अभिषेक रंगारी तसेच सर्व गावकरी बांधवांच्या विशेष समावेश आहे.

## थोडक्यात

### गट ग्रामपंचायत गांगणेर (हिवरा) येथील फॉगिंग मशीनलाच झालाय 'डेंगू'

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
एखाद्या रुग्णाच्या ताप औषधोपचार घेऊनही कमी होत नसल्यास, रक्त तपासणी केल्यानंतर अशा रुग्णाच्या आजाराच्या निदान डॉक्टर रक्त तपासणी अहवाल तपासल्यानंतर सामान्यपणे 'डेंगू'हा आजार



सांगतात. चाचेर-निमखेडा जिल्हा परिषद क्षेत्रातील गट ग्रामपंचायत गांगनेर ( हिवरा) येथील डेंगू या आजारावर प्रतिबंध लावण्यासाठी फवारणी करण्यासाठी वापरण्यात येणारी फॉगिंग मशीन मध्ये वारंवार बिघाड होत असून दुरुस्त केल्यानंतरही ती व्यवस्थित दुरुस्त होत नसल्याने, गट ग्रामपंचायत गांगनेर (हिवरा) येथील फागिंग मशीनलाच 'डेंगू' झाल्याची मिस्कील चर्चा गावात सुरू आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पंधरा दिवसापूर्वी मौदा तालुक्यात दिवसभर पाऊस झाल्याने, सदर मौदा तालुक्यातील विविध गावातील विविध वृत्तपत्राचे एजंट व वार्ताहर यांनी सायंकाळ दरम्यान वृत्तपत्राचे वितरण केले. गट ग्रामपंचायत गांगनेर (हिवरा) अंतर्गत येणाऱ्या गांगनेर येथे सायंकाळ दरम्यान माजी सरपंच प्रदीप राऊत यांच्या दुकानात वृत्तपत्राचे वितरण करीत असताना तेथील काही नागरिकांनी, गावात खूप मच्छर झाले असून, जनावरांना व माणसांना खूप चावत आहे. त्यामुळे जनावर व माणसांच्या हातापायांना मच्छराच्या चावण्याच्या खूप त्रास होत आहे. त्यामुळे गावकरी मच्छरामुळे खूप त्रस्त आहे. अर्ध्या गावात फॉगिंग मशीन ने फवारणी केली तर अधेर्गाव अजूनही फवारणी विना असल्याचे सांगत असताना, तेथे उपस्थित गट ग्रामपंचायत गांगनेर (हिवरा)चे सदस्य उमेश राऊत यांनी सांगितले की, अर्ध्या गावाची फवारणी झाल्यानंतर फॉगिंग मशीन बिघडली आहे. ती मशीन येथे दुरुस्त होत नसल्याने सध्या फॉगिंग बंद आहे. राऊत यांनी पुढे सांगितले की, फॉगिंग मशीनने चावणारे मच्छर मरत नसून फक्त डेंगू या आजाराचा प्रसार करणारे मच्छरच मरतात.

याबाबत ग्रामपंचायतचे सचिव वरुडकर यांना ग्रामपंचायत कार्यालयात पाच दिवसांपूर्वी विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, फॉगिंग मशीन कामठीवरून दुरुस्त करून आणली, दुरुस्तीच्या बिल दाखवत त्यांनी सांगितले की, जवळपास ५००० (अक्षरी पाच हजार) रुपये खर्च आला. दुरुस्त करून आणल्यानंतर गट ग्रामपंचायत गांगणेर (हिवरा) अंतर्गत येणाऱ्या हिवरा येथे ती मशीन पुन्हा फॉगींग साठी नेली असता पुन्हा बिघडली, ही मशीन वारंवार बिघडत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे ती ग्रामपंचायत मध्ये ठेवली आहे. त्यामुळे गट ग्रामपंचायत गांगनेर (हिवरा) येथील डेंगू वर प्रतिबंध लावण्यासाठी वापरण्यात येणारी फॉगिंग मशीनलाच डेंगू झाल्याची मिस्कील चर्चा गावात सुरू आहे. या फॉगिंग मशीनचा डेंगूच्या आजार दुरुस्त झाल्यानंतर, फवारणी करताना डेंगूच्या मच्छराबरोबर जनावर व माणसांना चावणारे मच्छर मरण्यासाठी त्या मशीनमध्ये माणसं व जनावरांना चावणारे मच्छरही मरावे अशी औषध टाकण्याची मागणी मच्छराच्या चावण्यामुळे त्रस्त नागरिकांनी केली आहे.

### भारत निर्माण आंदोलनाच्या विधानसभा संयोजकपदी योगेश धोटे पाटील व संतोष बुजाडे

**नागपूर दक्षिणची जबाबदारी योगेश धोटे पाटील यांच्यावर; नागपूर पूर्व विधानसभा संयोजकपदी संतोष बुजाडे**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारत निर्माण आंदोलनाच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देण्यासाठी नागपूर शहरातील विधानसभा मतदारसंघनिहाय नवीन जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील यांची नागपूर दक्षिण विधानसभा संयोजक म्हणून, तर संतोष गोविंदराव बुजाडे यांची नागपूर पूर्व विधानसभा संयोजक म्हणून निवड करण्यात आली. ही निवड अविनाश काकडे यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. गौतम मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. निवड झालेल्या दोन्ही पदाधिकाऱ्यांना यावेळी नियुक्तीपत्र प्रदान करून आगामी काळातील संघटनात्मक जबाबदारी सोपविण्यात आली. भारत निर्माण आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, नागरिकांच्या समस्या तसेच विविध जनहिताच्या मुद्द्यांना संघटितपणे वाचा फोडण्याच्या दृष्टीने विधानसभा स्तरावर संघटन मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या संयोजकांकडून त्यांच्या- त्यांच्या विधानसभा मतदारसंघात संघटनेची बांधणी, कार्यकर्त्यांचे संघटन आणि जनसंपर्क वाढविण्यासाठी प्रभावीपणे काम केले जाण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील यांच्यावर नागपूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, संतोष गोविंदराव बुजाडे यांच्याकडे नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या संयोजकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

दोन्ही नवनियुक्त संयोजकांनी संघटनेने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमाला आशिष खुबळकर, भारत ठाकरे, कुलवंत सिंग भामरा, तुषार ढोबळे, रोकडे साहेब, चंदू पाटील यांच्यासह भारत निर्माण आंदोलनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवीन नियुक्त्यांमुळे नागपूर दक्षिण आणि नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघात भारत निर्माण आंदोलनाच्या संघटनात्मक कार्याला अधिक व्यापक स्वरूप मिळणार असून, आगामी काळात जनसंपर्क व संघटन विस्ताराला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### टँकरच्या धडकेत ३२ वर्षांच्या महिलेचा मृत्यू

**वृत्तसंस्था, मुंबई** - राज्याची राजधानी मुंबईतील रस्ते अपघाताच्या घटना सुरुच असल्याचं पाहायला मिळतंय. गणशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत काल प्रभादेवीत एक कार घुसल्यानं चार जण जखमी झाली होते. आज अंधेरी पूर्वमध्ये एक धक्कादायक घटना घाडली आहे. मरोळ नाका येथे भरधाव पेट्रोल टँकरनं चिरडल्यानं ३२ वर्षांच्या महिलेचा मृत्यू झालेला आहे. या प्रकरणी टँकर चालकाला अटक करण्यात आली आहे. मृत महिला कामावरुन सुटल्यानंतर घरी जात होती. मात्र, या अपघातात तिला जीव गमवावा लागला. पोलिसांनी टँकर चालक अपघातावेळी नशेत होता की नव्हता याचा शोध घेण्यासाठी रक्ताचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

# उदापूर सोलर प्रकल्पातून केबल चोरीचा डाव उधळला, चौघे अटकेत

## ट्रॅक्टर-ट्रॉलीच्या लोखंडी बॉक्समध्ये लपवली होती एक किलोमीटर केबल, ३.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील उदापूर येथे महाराष्ट्र राज्य महानिर्मिती कंपनी मर्यादित (महाजनको) अंतर्गत सुरू असलेल्या १२८ मेगावॉट क्षमतेच्या सोलर प्रकल्पातून विद्युत साहित्य व केबल चोरी करण्याचा प्रयत्न जलालखेडा पोलिसांनी उधळून लावला. सुरक्षा रक्षकांच्या सतर्कतेमुळे चोरीची केबल ट्रॅक्टर-ट्रॉलीतून प्रकल्पाबाहेर नेण्यापूर्वीच तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तपासात आणखी एका आरोपीचा सहभाग उघड झाल्याने पोलिसांनी चौथ्या आरोपीलाही अटक केली. या कारवाईत सुमारे ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




उदापूर येथील सोलर प्रकल्पाचे काम केपीआय ग्रीन एनर्जी लिमिटेड कंपनीकडून सुरू आहे. प्रकल्प परिसरातून पहाटेच्या सुमारास काही मजूर ट्रॅक्टरमधून विद्युत तारा व इतर साहित्य घेऊन संशयास्पदरीत्या बाहेर जात असल्याचे सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास आले. संशय बळावल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी ट्रॅक्टर-ट्रॉली अडवून संबंधितांची चौकशी केली आणि घटनेची माहिती प्रकल्पाच्या सुपरवायझरला दिली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच जलालखेडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी ट्रॅक्टर-ट्रॉलीची बारकाईने तपासणी केली असता ट्रॉलीच्या खाली तयार करण्यात आलेल्या लोखंडी बॉक्समध्ये सोलर प्रकल्पातील सुमारे एक किलोमीटर लांबीची केबल लपवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी केबलसह ट्रॅक्टर-ट्रॉली ताब्यात घेत संशयितांची चौकशी सुरू केली.

या प्रकरणी सहीराम गणपतराम भाटी (वय ५०, रा. दुलापूर कैरी, ता. व जि. श्रीगंगानगर, राजस्थान), विजयकुमार दिलीपराम मेघवाल (वय ४६, रा. शिवपूर भूताई, ता. व जि. श्रीगंगानगर, राजस्थान) आणि छिद्रपाल फुलाराम मेघवाल (वय ४७, रा. सत्ताखेडा, ता. डबवाली, जि. सिरसा, हरियाणा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली.

**गोपनीय माहिती व तांत्रिक पुराव्यांतून चौथा आरोपी निष्पन्न**

गुन्ह्याचा तपास पुढे सुरू असताना पोलिसांना मिळालेली गोपनीय माहिती तसेच तांत्रिक पुराव्यांच्या आधारे इंदाज हनुमान मेघवाल (वय २२, रा. रामसिंगपूर, ता. विजयनगर, जि. श्रीगंगानगर, राजस्थान) याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी त्यालाही अटक केली.

**एक किलोमीटर केबलसह ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त**

पोलिसांनी आरोपींकडून सुमारे एक किलोमीटर लांबीची स्टिंग केबल, अंदाजे किंमत ७५ हजार रुपये, एमएच ४० सीक्यू ८७०६ क्रमांकाचा ट्रॅक्टर आणि विनाक्रमांकाची ट्रॉली असा एकूण ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे, केबल लपविण्यासाठी ट्रॉलीच्या खाली लोखंडी बॉक्स तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. मात्र ट्रॅक्टर मालकावर कारवाई करण्यात आलेली नाही. सोलर प्रकल्पासारख्या संवेदनशील व मोठ्या औद्योगिक प्रकल्पातून विद्युत साहित्य चोरीचा प्रयत्न झाल्याने सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे. सुरक्षा रक्षकांच्या सतर्कतेमुळे चोरीचा प्रयत्न वेळीच उघडकीस आल्याने मोठ्या प्रमाणातील साहित्य चोरीला जाण्यापासून वाचले.

या प्रकरणाचा पुढील तपास जलालखेडा पोलीस स्टेशन चे ठाणेदार विनोद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

# नगरधन येथील राईस मिलच्या तलावात बुडून ३ बिहारच्या मजुरांचा मृत्यू

## रामटेक-मौदा मार्गावर हृदयद्रावक घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
रामटेक-मौदा रोडवरील मौजा नगरधन येथील मोहनलाल शंकरलाल अ‍ॅग्रो फुड्स प्रा. लि. च्या राईस मिलमध्ये काम करणाऱ्या तीन अल्पवयीन हमाल कामगारांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी २६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १.३० ते २.०० वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.
गुलशन कुमार, वय २० वर्ष, रा. पुर्निया (बिहार), रुपेश कुमार, वय १८ वर्ष, रा. खगरिया (बिहार), मनीष कुमार, वय १८ वर्ष, रा. पुर्निया (बिहार) अशी मृतकांची नावे आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटना अशी आहे की, तिन्ही मृतक हे कंत्राटदार प्रशांत कुमार (बिहार) यांच्यामार्फत गेल्या २० ते २२ दिवसांपासून या राईस मिलमध्ये हमाली कामासाठी आले होते. या मिलमध्ये एकूण ५० ते ६० हमाल काम करतात.




दररोजप्रमाणे तिघांची सकाळची शिफ्ट होती. शिफ्ट संपल्यानंतर उन्हामुळे अंगाची लाही झाल्याने तिघेही मिलच्या मागे असलेल्या अंदाजे ६०७४० फूट लांब आणि १५ ते २० फूट खोल असलेल्या तलावात आंघोळीसाठी गेले. पोहता येत नसल्याने आंघोळ करताना तोल जाऊन तिघेही खोल पाण्यात बुडाले. आरडाओरड ऐकून इतर हमालांनी धाव घेतली व मिल मालकाला माहिती दिली. मिल मालकाने तात्काळ रामटेक पोलिसांना कळविले.
घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते आणि रामटेकचे पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात यांनी पथकासह घटनास्थळ गाठले. स्थानिक मच्छीमार बांधवांच्या मदतीने तिन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. त्यांना तात्काळ उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. सदर तलावाभोवती कोणतेही संरक्षक कठडे किंवा सूचना फलक नव्हते का? परप्रांतीय मजुरांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची? असे सवाल उपस्थित होत आहेत. या प्रकरणी पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

थोडक्यात

## बाजार समितीचा खरा मालक शेतकरीच : मुळक

### बाजार समितीची सर्वसाधारण सभा व कृषी मेळावा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांची संस्था असून शेतकरीच तिचा खरा मालक आहे. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. संवादातून संस्था आणि लोकशाही बळकट होते, असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांनी केले. भिवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व कृषी मेळाव्यात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. आमदार संजय मेश्राम, सभापती बाळू इंगोले, नगराध्यक्ष सुषमा श्रीरामे, उपसभापती चंद्रशेखर ढाकुणकर, माजी सभापती विठ्ठल राऊत, दिलीप राऊत आदी उपस्थित होते. सभापती इंगोले यांनी बाजार समितीतील सुविधांची तसेच प्रस्तावित विकासकामांची माहिती दिली. सचिव रामकृष्ण गोंगल यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला.
यावेळी आमदार मेश्राम यांनी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचे सांगत सरसकट कर्जमाफीची मागणी केली. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी शासनाच्या कर्जमाफी धोरणावर टीका केली. गोसेखुर्द प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सुटेपर्यंत नळगंगा-वैनगंगा नदीजोड प्रकल्पाला विरोध राहील, असे त्यांनी सांगितले. बाजार समितीच्या आवारात डब्ल्यूसीएलच्या सौजन्याने उभारलेल्या शुद्ध जल संयंत्राचे मुळक व मेश्राम यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यानिमित्त कृषी मेळावा व कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील सरपंच व सेवा सहकारी संस्थांच्या अध्यक्षांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन यावेळी सत्कार करण्यात आला.

## रस्त्यावरील अतिक्रमणप्रकरणी भागेबोरी येथील ग्रा.पं. सदस्य अपात्र, अपर जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
भागेबोरी ग्रामपंचायतीचे सदस्य नागेश बंडू ठाकरे यांच्या कुटुंबीयांचे शासकीय रस्त्याच्या जागेवर अतिक्रमण असल्याचे भूमी अभिलेख विभागाच्या मोजणी अहवालातून स्पष्ट झाल्याने त्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४ (१) (ज-३) अन्वये ग्रामपंचायत सदस्यपदासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. अपर जिल्हाधिकारी प्रविण महिरे यांनी २ सप्टेंबर २०२६ रोजी हा आदेश दिला. ठाकरे यांच्या कुटुंबीयांच्या नावावर भागेबोरी येथे मालमत्ता क्रमांक १०० आणि १०१ असल्याचे चौकशीत समोर आले. भूमी अभिलेख विभागाच्या अहवालानुसार अनुक्रमे ७२ आणि ८४ चौरस मीटर क्षेत्रावर त्यांचा ताबा आहे. ही घरे सन १९७८-७९ च्या गाव नकाशात दर्शविण्यात आली असून, पुनर्मोजणी नकाशात घरांचे रेखाटन रस्त्याच्या जागेवर असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
याप्रकरणी प्रमोद हरिभाऊ डोमळे यांनी २६ ऑगस्ट २०२४ रोजी ठाकरे यांचे सदस्यपद रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज दाखल केला होता. सुरुवातीच्या तहसीलदारांच्या अहवालात अतिक्रमणाबाबत स्पष्ट निष्कर्षासाठी भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यानंतर करण्यात आलेल्या मोजणीनंतर सादर अहवालाच्या आधारे अपर जिल्हाधिकाऱ्यांनी ठाकरे यांना अपात्र ठरविले.

## युवासेना पूर्व विदर्भ समन्वयकपदी रोहित मिश्रा यांची नियुक्ती

### शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराची जबाबदारी, वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
युवासेनेच्या पूर्व विदर्भातील संघटनात्मक कार्याला अधिक बळ देण्यासाठी रोहित रमेश मिश्रा यांची युवासेना पूर्व विदर्भ समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. युवासेना मध्यवर्ती कार्यालया



च्यावतीने ३ सप्टेंबर २०२६ रोजी, या संदर्भातील नियुक्तीपत्र जारी करण्यात आले. नियुक्तीपत्रानुसार, शिवसेना मुख्य नेते तथा माननीय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली रोहित मिश्रा यांची युवासेना पक्षाच्या पूर्व विदर्भ समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. युवासेना पदाधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.
पूर्व विदर्भातील युवकांशी संपर्क वाढविणे, युवासेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे तसेच विविध सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांमध्ये युवकांचा सहभाग वाढविण्याची जबाबदारी या पदाच्या माध्यमातून मिश्रा यांच्यावर राहणार आहे. नियुक्तीपत्रात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण आत्मसात करून शिवसेना पक्षाच्या विस्तारासाठी कार्य करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या नियुक्तीबद्दल रोहित मिश्रा यांचे युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांकडून अभिनंदन होत असून, पूर्व विदर्भातील युवकांना संघटनेशी जोडण्यासाठी आणि संघटनात्मक कार्याला गती देण्यासाठी त्यांच्या नियुक्तीची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट होते. नियुक्तीपत्रावर पूर्वेश परिषा प्रताप सरनाईक (पूर्वी युवासेना कार्याध्यक्ष), किरण साळी (युवासेना सचिव) आणि राहुल लोंढे (युवासेना मुख्य सचिव) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आपल्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा, अशा शब्दांत नियुक्तीपत्रातून रोहित मिश्रा यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## ऐतिहासीक मस्कऱ्या (हडपक्या) पारंपारिक गणपतीचे आगमन २७ सप्टेंबरला व स्थापना २९ सप्टेंबर रोजी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
इ.स.१७८७ मध्ये श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोंसले (उर्फ चिमणाबापू) यांनी मस्कऱ्या (हडपक्या) या उत्सवाचे आयोजन केले होते, या मागील थोडक्यांत इतिहास असा की शुर लढव्यय सरकार समशेर बहाद्दूर श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोंसले (उर्फ चिमणाबापू) हे अन्यायाच्या विरोधात लढत असतांना ते बंगालच्या स्वारीवर होते. बंगाल वर विजय मिळवून परत येत असतांना कुळाचारी गणपतीचे विसर्जण झाले होते.
बंगालवर विजय मिळविण्याचा आनंद साजरा करण्याकरीता या मसकऱ्या (हडपक्या) गणपतीची स्थापना करून त्यात विविध नकला लावण्या, खडी गम्मत या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करुण हा आनंदोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यात आला. कालांतराने लोकमान्य टिळक हे ही अन्याया विरुध्द स्वातंत्र्यासाठी लढा देतांना महाराजांच्या दुरदृष्टीचा अभ्यास करून टिळकांनी कुळाचारी गणपतीला सार्वजनिक उत्सवाचे रूप दिले. श्रीमंत राजे खंडोजी महाराजांनी पितृपक्षात मस्काऱ्या (हडपक्या) गणपतीची चालु केलेली ही परंपरा आजपर्यंत कायम आहे. श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोंसले हे महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टच्या व्यवस्थापनात व मार्गदर्शनात हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा करतात.
नागपूरचा ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जपणाऱ्या तसेच नवसाला पावणारा गणपती अशी ख्याती असलेल्या ऐतिहासिक मस्कऱ्या अर्थात हडपक्या गणेशोत्सव उत्सव यावर्षी २०२६ मध्ये २३९ वर्ष पूर्ण होत आहे, श्रीमंत राजे खंडोजी महाराजाच्या काळात या गणपतीची १८ हाताची, २१ फुटाची मुर्ती स्थापन केली जात होती. त्या अनुषंगाने तसी च मुर्ती १८ हाताची ७ फुटाची गणेशाची मूर्ती स्थापीत केली जाणार आहे. या गणपतीचे विशेष महत्व म्हणजे हा नवसाला पावणारा गणपती आहे. आणी आजही बऱ्याच भक्तांना प्रचिती होत आहे.
गणपतीची आगमन मिरवणुक दि. २७ सप्टेंबर ला सायंकाळी ६ वाजता सी.पी अँन्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग येथून मार्गक्रमण करून ज्युनियर भोंसला पॅलेस, राजे प्रतापसिंह भोंसले चौक (सुतिका गृह) कोतवाली पोलीस स्टेशन चौक, नरसिंग टॉकिज चौक, सिनीयर भोंसला पॅलेस असा आगमन मिरवणुकीचा मार्ग राहील.

## शेफ नीता अंजनकर करणार ४ ऑक्टोबर रोजी ५५० किलो गोपालकाला बनवण्याचा विक्रम

### धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये विदर्भस्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरच्या प्रसिद्ध शेफ आणि कॅन्सर योद्धया नीता अंजनकर पुन्हा एकदा विक्रमाच्या दिशेने वाटचाल करणार आहेत. येत्या ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता काँग्रेसनगर येथील धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये तब्बल ५५० किलो गोपालकाला तयार करून वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडनमध्ये नवा विक्रम नोंदविण्याचा त्या प्रयत्न करणार आहे. यापूर्वीही शेफ नीता अंजनकर यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये १,००० किलो आंबील तयार करण्याचा विक्रम नोंदविला आहे. तसेच ५०० किलो कच्चा चिवडा तयार करण्याची विक्रमी कामगिरीही त्यांच्या नावावर आहे. आता ५५० किलो गोपालकाला तयार करून त्या आणखी एका विक्रमाच्या दिशेने पाऊल टाकणार आहेत.



महाराष्ट्र टेलिकम्युनिकेशनच्यावतीने त्या अनुषंगाने २ ऑक्टोबर रोजी विदर्भस्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सर्व वयोगटांतील स्पर्धक सहभागी होत असून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी नावनोंदणी केली आहे.या स्पधेर्चे पारितोषिक वितरण ४ ऑक्टोबर रोजी होईल. कर्करोगाशी झुंज देत असतानाही विविध आव्हाने स्वीकारून पाककलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नीता अंजनकर यांनी आतापर्यंत अनेक पुरस्कार आणि विक्रम आपल्या नावावर केले आहेत. त्यांच्या संघर्षमय प्रवासासोबतच पाककलेतील सातत्यपूर्ण कामगिरी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## दाटलेल्या मनाने गणरायाला निरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** हुडकेश्वर रोड येथील राधे ट्रेडर्सचे संचालक अनिल देशमुख यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे शुक्रवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या उत्साहानंतर बाप्पाला निरोप देताना कुटुंबीय आणि मित्रपरिवार भावूक झाला. गणेश विसर्जनासाठी देशमुख कुटुंबीयांसह मित्रमंडळी गजानन शाळा हुडकेश्वर रोड येथे एकत्र जमली होती. यावेळी गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करून आरती करण्यात आली. त्यानंतर 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात बाप्पाच्या मूर्तीची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.



दहा दिवसांच्या सहवासानंतर लाडक्या गणरायाला निरोप देताना उपस्थितांच्या भावना दाटून आल्या. भक्तिमय वातावरणात गणरायाच्या मूतींर्चे तळ्यात विसर्जन करण्यात आले. पुढील वर्षी पुन्हा लवकर येण्याचे आवाहन करीत कुटुंबीय व मित्रपरिवाराने बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची लोह्यात दुष्काळसदृश भागाची पाहणी

**नांदेड/लोहा :** पावसाने खंड दिल्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट आम्ही पाहणी करत आहोत. सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. पाणी समस्या,पशुधन, चारा तसेच शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण यासाठी राज्यसरकार शेतकऱ्याच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार आहे, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोनखेड परिसरात पीक पाहणी करताना शेतकऱ्यांना आश्वासित केले. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी (२६ सप्टेंबर) जिल्ह्याच्या दुष्काळ पीक पाहणी दौऱ्यावर आल्या होत्या. सकाळी साडे नऊ वाजता कंधार रस्त्यावरील शिवाजी वाघमारे आणि सोनखेड परिसरातील शेतात त्यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. त्याच्या सोबत राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, माजी आ. मोहन हंबर्डे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## घोटमुंढरी येथील जिल्हा परिषद शाळेत विकासाची नवीन पायरी!

### महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंजूर केलेल्या १६.४५ लक्ष रुपयांच्या शालेय संरक्षण भिंतीचे भूमिपूजन थाटात

**दै. सिंहवाणी वृत्त,**
**किशोर साहू : मौदा**
महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' योजनेंतर्गत, डीपीसी २०२५-२६ योजनेंतर्गत खात - रेवराल जिल्हा परिषद क्षेत्रातील गट ग्रामपंचायत घोटमुंढरी अंतर्गत येत असलेल्या घोटमुंढरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय संरक्षण भिंत बांधकामासाठी १६.४५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण विकास कामाचे भूमिपूजन माजी जिल्हा परिषद सदस्य राधा मुकेश अग्रवाल यांच्या हस्ते नुकतेच उत्साहात संपन्न झाले.



याप्रसंगी माजी पंचायत समिती सभापती स्वप्निल श्रावणकर , सरपंचा चंदा गेडाम, सचिव हरीश धार्मिक,ग्राम पंचायत सदस्य विलास पटले, अरविंद भोयर, मौसमी घरडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उदय पांडे, मुख्याध्यापक विकास धारगावे,शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच शाळा परिसरातील नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.
भूमिपूजन सोहळ्यानंतर शाळेतील अत्याधुनिक एआय व व्हिआर लॅबची पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या या आधुनिक शिक्षणाचे दर्शन घेत, शाळेच्या अडीअडचणी व समस्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून त्या लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना देण्यात आल्या.
विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे प्रयत्न सदैव कटिबद्ध आहेत, असे मत याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्या राधा मुकेश अग्रवाल यांनी व्यक्त केले.

## बॅंक कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावित संपः ग्राहकांनो २८ सप्टेंबरपूर्वी वीजबिल ऑनलाईन भरा!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बॅंक कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी युनियनतर्फे २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशभरात तीन दिवसांचा संप पुकारण्यात आला आहे. बॅंक कर्मचाऱ्यांच्या या प्रस्तावित संपामुळे बॅंकिंग क्षेत्रातील नियमित कामकाज, रोख व्यवहार आणि प्रामुख्याने धनादेश (चेक) क्लिअरन्स प्रक्रिया विस्कळीत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, महावितरणने आपल्या सर्व वर्गवारीतील वीजग्राहकांना संभाव्य आर्थिक व तांत्रिक गैरसोय टाळण्यासाठी २८ सप्टेंबरपूर्वीच ऑनलाईन पद्धतीने वीजबिल अदा करण्याचे विशेष आवाहन केले आहे.

### धनादेश क्लिअरन्समध्ये अडथळ्याची शक्यता

राज्यातील आणि विशेषतः नागपूर परिमंडलातील अनेक ग्राहक आपले मासिक वीजबिल भरण्यासाठी नियमितपणे धनादेशाचा (चेक) वापर करतात. मात्र, २८ ते ३० सप्टेंबर दरम्यान बॅंकांचे कामकाज बंद राहिल्यामुळे धनादेश वेळेत वटणार नाहीत किंवा क्लिअरन्स प्रक्रियेत मोठा खोळंबा होऊ शकतो. त्यामुळे बॅंक संपाच्या कालावधीत धनादेशाद्वारे बिल भरल्यास ते वेळेत जमा न होण्याचा धोका असून, ऐनवेळी ग्राहकांना थकबाकीपोटी वीज खंडित होण्यासारखा अनावश्यक मनस्ताप सहन करावा लागू शकतो.

### विलंब आकार टाळा आणि 'प्रॉम्प्ट पेमेंट' सवलतीचा लाभ घ्या

ज्या वीजग्राहकांच्या वीजबिलांची अंतिम मुदत किंवा 'तत्पर देयक भरणा' सवलतीची तारीख २८ ते ३० सप्टेंबर दरम्यान येत आहे, त्यांनी या परिस्थितीची विशेष नोंद घेणे आवश्यक आहे. देय तारखेनंतर बिल भरल्यास ग्राहकांना नियमानुसार विलंब आकार (लेट फी) सहन करावा लागतो. हा नाहक आर्थिक दंड टाळण्यासाठी आणि तत्पर देयक भरण्याच्या सवलतीचा पूर्ण लाभ मिळवण्यासाठी ग्राहकांनी मुदतीपूर्वी म्हणजेच २८ सप्टेंबरपूर्वीच आपले डिजिटल पेमेंट पूर्ण करावे, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

### घरबसल्या ऑनलाईन पेमेंटचे सुलभ पर्याय

ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरणने अत्याधुनिक आणि अत्यंत सोपे ऑनलाईन भरणा पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. वीजग्राहक महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा महावितरण या मोबाईल अ‍ॅपद्वारे घरबसल्या अगदी सहजपणे वीजबिल भरू शकतात. यासाठी नेटबॅंकिंग, क्रेडिट व डेबिट कार्ड, विविध मोबाईल वॉलेट्स आणि युपीआय यांसारख्या डिजिटल पद्धतींचा वापर करता येतो.
विशेष म्हणजे, ऑनलाईन डिजिटल माध्यमांचा वापर करून वेळेत वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना दरमहा ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के अतिरिक्त सूटही मिळते. नागपूर परिमंडलासह राज्यातील बहुसंख्य ग्राहक आधीच या डिजिटल सेवेचा आणि तत्पर देयक सवलतीचा उत्तम लाभ घेत आहेत. डिजिटल क्रांतीचा स्वीकार करत बॅंक संपाच्या काळात होणारी संभाव्य गैरसोय टाळावी, वेळेची आणि पैशांची बचत करावी, तसेच महावितरणच्या या ग्राहकाभिमुख उपक्रमात सहभागी होऊन ऑनलाईन सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

थोडक्यात

## पोरवाल कॉलेजच्या लेदर संघाचा तालुकास्तरीय स्पर्धेत दिमाखदार विजय



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कामठी येथील एस के पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांनी वयोगट अंडर नाईन्टीन लेदर बॉल क्रिकेट टीम जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी क्वालिफाय ठरली. ही स्पर्धा २४ सप्टेंबर २०२६ रोजी पोरवाल कॉलेजच्या मैदानावर घेण्यात आलेल्या या स्पर्धेत पोरवाल संघाने प्रथम फलंदाजी करत स्वामी अवदेशानंद समोर ५७ धावांचे लक्ष ठेवले. मात्र पोरवाल संघाच्या भेदक गोलंदाजीपुढे अवदेशानंद संघ टिकू शकला नाही. अवघ्या २५ भावांवर हा संघ गारच झाला. पोरवाल संघाच्यावतीने सर्वाधिक धावा वंश जैन ने २८ धावा तर आरोप पटेल ने अवघ्या ८ चेंडूमध्ये २२ काढल्या.

सुधांशू सिंगच्या भेदक गोलंदाजीपुढे प्रतिस्पर्धी संघ टिकाऊ धरू शकला नाही. सुधांशु सिंह ने लाखो पाठ तीन विकेट घेऊन विजयाचा पाया रचला. पोरवाल संघात अनुज चव्हाण,सर्वज्ञ कुर्वे ,सम्यक प्रसाद,श्लोक यादव, वीर कश्यप, विष्णू दिवाकर, विनीत नागपुरे,वंश जैन,मोईन रहमान, प्रथम मधुमटके,गोविंद तिवारी, ईशांत गोंधळे,आरव पटेल,सुधांशू सिंग, इत्यादींचा समावेश होता. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका प्रा.डॉ.मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात, उपप्राचार्य प्रा. विश्वनाथ वंजारी व पर्यवेक्षक प्रा. नरेंद्र मेंढे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजेचा संघाचे कौतुक केले व पुढील वाटचालीला म्हणजेच जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेला शुभेच्छा दिल्या.

## कीट्स रामटेकमध्ये बी.टेक. विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन व ओरिएंटेशन कार्यक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (कीट्स), रामटेकच्या अप्लाइड सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागातर्फे प्रथम व द्वितीय वर्ष बी.टेक.च्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन व ओरिएंटेशन कार्यक्रमाचा तिसरा टप्पा २४ सप्टेंबर रोजी सिल्व्हर जुबिली कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अविनाश एन. श्रीखंडे व मान्यवरांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. अविनाश एन. श्रीखंडे यांनी संस्थेची उत्कृष्ट अध्यापन पद्धती, सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रणाली, वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कार्यपद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्लब व अभ्यासेतर उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शिस्त व आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विभागप्रमुख डॉ. के. गजानन यांनी शैक्षणिक दिनदर्शिका, नियमित वर्ग, समुपदेशन सत्रे आणि करिअरमध्ये संवाद कौशल्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा परिचय करून दिला. दुपारच्या सत्रात डॉ. विलास महात्मे, डॉ. अनंत दाभाडे, डॉ. पंकज आष्टनकर, डॉ. महेश मावळे व डॉ. श्रीकृष्ण चिंचोलकर यांनी विभागांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. योगीराज बकाले यांनी केले. प्रवेश समन्वयक प्रा. श्रीनिवास रायडू यांनी आभार मानले. कार्यक्रमास २०० हून अधिक विद्यार्थी, पालक तसेच २० हून अधिक शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## रिआन हॉस्पिटल द्वारा गणेशोत्सवात विविध आरोग्य सेवा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

श्रीगणेशा आरोग्याचा अभियान २.० अंतर्गत आयुष्मान भारत एकत्रित जन आरोग्य योजना, पंतप्रधान जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत १३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सवादरम्यान संपूर्ण महाराष्ट्रभर निःशुल्क आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत रिआन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रामटेक व आकाशझेप फाऊंडेशन रामटेक द्वारा १८ सप्टेंबरला विला-४४ रेस्टॉरंट देवलापार, २१ सप्टेंबरला रामाळेश्वर देवस्थान गणेश मंडळ रामटेक व २२ सप्टेंबरला छोटे गणराज नवस्फूर्ती बाल गणेश मंडळ शास्त्री वॉर्ड रामटेक येथे निःशुल्क आरोग्य तपासणी व औषधी वितरण शिबीर घेण्यात आले.

या शिबिरात सामान्य रुग्ण तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, ब्लड शुगर तपासणी, स्त्रीरोग तपासणी, हृदयरोग तपासणी , बालरोग तपासणीअस्थिरोग तपासणी करून औषधी वितरण करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रदीप बोरकर यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. आशिष सांगोडे, डॉ. मुक्ता गोंदुळे आणि संपूर्ण वैद्यकीय चमूने आरोग्य सेवा प्रदान केली. आम्ही भारतीय अभियानाचे मुख्य संयोजक साक्षोधन कडबे यांनी रिआन हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या शासकीय आरोग्य योजनांची उपस्थितांना माहिती दिली. तिन्ही शिबिरादरम्यान परिसरातील २०० आबालवृद्धांनी शिबिरातील निःशुल्क आरोग्यसेवा व सुविधांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांनी मोलाचे योगदान दिले.

# बायोचार निर्मितीतून शाश्वत शेतीला मिळू शकते नवी दिशा

### नितीन गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास, 'बायोचार निर्मिती परिषदे'त साधला संवाद




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतीच्या विकासासाठी उत्तम बियाणे व कलम, जमिनीची नियमित तपासणी आणि जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविणे या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. सेंद्रिय कर्ब हे मातीच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक असून त्याचे प्रमाण वाढविण्यासाठी बायोचार हा प्रभावी पर्याय आहे. मोठ्या प्रमाणावर बायोचार निर्मिती करून त्याचा शेतीमध्ये वापर केल्यास शाश्वत शेतीला नवी दिशा मिळू शकते, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या वतीने शनिवारी हॉटेल तुली इम्पेरियल येथे आयोजित बायोचार निर्मिती परिषदेचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला महाराष्ट्रातून आलेल्या युवा शेतकऱ्यांची संख्या मोठी होती.

परिषदेला डॉ. बावसकर टेक्नॉलाजी प्रा. लि. चे कार्यकारी व्यवस्थापकीय संचालक धैर्यशील बावसकर, बायोचार बाईट ॲगटेक प्रा. लि., पुणेचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी उदय कुमार मठपती, ग्रो इंडिगो कंपनीच्या संस्थापक डॉ. उषा बरवाले, प्रगतिशील शेतकरी आनंद राऊत, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर आणि सचिव डॉ. सी. डी. मायी यांची मंचावर उपस्थिती होती. ॲग्रोव्हिजनच्या माध्यमातून यशस्वी प्रयोग आणि नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न होत असल्याचे सांगत गडकरी म्हणाले की, जमिनीतील सेंद्रिय कबार्चे प्रमाण वाढल्यास कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते. उत्पादन वाढविण्यासोबतच त्याची गुणवत्ता आणि प्रक्रिया क्षमता वाढविल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. बायोचार सारख्या विविध तंत्रज्ञानाची आर्थिक व्यवहार्यता सिद्ध करून ते मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. आजचा शेतकरी सुज्ञ असून तो नवनवीन प्रयोग करीत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासोबतच ग्रामीण भागातील तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे विभागप्रमुख डॉ. हरीहर कौसडीकर, बीएआयएफ, पुणेचे वरिष्ठ अधिकारी डॉ. सदाशिव निबाळकर, एमजीआयआरआय, एमगिरी वर्धाचे वरिष्ठ वैज्ञानिक संदीप जोशी, बायोचार बाईट ॲगटेक प्रा. लि.चे सहसंस्थापक व मुख्य संचालन अधिकारी विनायक पाटील, टीईओ व्हेंचर्स अँड सनकार्बनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी समीर शर्मा यांनी मार्गदर्शन केले.

उदयकुमार मठपती व विनायक पाटील यांनी बायोचाराची नवीन संकल्पना मांडली. ते म्हणाले, एफपीओ किंवा कोऑपरेटीव सोसायटी स्थापन करून जर कचरा गोळा केला तर मोठ्या प्रमाणात बायोचार निर्मिती होऊ शकते. व त्याचा फायदा गावातील शेतकऱ्यांना होऊ शकतो.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. त्यांनी तज्ज्ञांकडून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. डॉ. सी. डी. मायी यांनी प्रास्ताविक केले, तर नितीन कुळकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. परिषदेला महाराष्ट्रातील शेतकरी, उद्योग, संशोधन, तंत्रज्ञान आणि पर्यावरण क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कमी खर्चात बायोचार निर्मिती : डॉ. केशव क्रांथी**

नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक राहिलेले आणि आता आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती, वॉशिंग्टन डी.सी.च्या तांत्रिक माहिती विभागाचे प्रमुख डॉ. केशव क्रांथी यांनी शाश्वत आणि पुनरुत्पादक शेतीसाठी बायोचार निर्मितीच्या सोप्या आणि कमी खर्चिक पद्धती सांगितल्या. कापसाच्या पिकाचे अवशेष आणि इतर शेती कचऱ्यापासून आफ्रिका आणि आशियातील गरीब शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी खर्चात आणि सोप्या पद्धतीने बायोचार तयार करण्याचे तंत्रज्ञान कसे विकसित केले, याची माहिती अतिशय सोप्या शब्दात दिली.

### बायोचार शेतीसाठी महत्त्वाचा का ?

मातीची सुपीकता टिकवून ठेवणे हे शाश्वत शेतीसमोरील मोठे आव्हान आहे. सततची शेती, रासायनिक निविष्ठांचा वाढता वापर, सेंद्रिय कर्बाची घट आणि जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होणे यामुळे अनेक ठिकाणी मातीच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. योग्य पद्धतीने तयार करून आणि योग्य पद्धतीने वापरल्यास बायोचार मातीमध्ये सेंद्रिय कर्ब वाढवणे, मातीची रचना सुधारण्यास मदत करणे आणि पाणी व पोषकद्रव्ये धरून ठेवण्याची क्षमता वाढविण्यास हातभार लावणे, अशा विविध प्रकारे उपयोगी ठरू शकतो.

### बायोचार म्हणजे नेमके काय ?

शेतीमध्ये पिकांचे अवशेष, काडीकचरा, भुसा, फांद्या, नारळाच्या करवंट्या किंवा इतर जैविक पदार्थ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतात. अनेकदा या अवशेषांची योग्य विल्हेवाट न लागल्याने ते जाळले जातात. मात्र, योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून या जैविक अवशेषांचे ऑक्सिजनचा मर्यादित पुरवठा असलेल्या परिस्थितीत नियंत्रित तापमानावर रूपांतर केले असता तयार होणाऱ्या कार्बनयुक्त पदार्थाला बायोचार म्हणतात. बायोचार हा केवळ शेतातील कचऱ्यापासून तयार होणारा पदार्थ नाही, तर मातीच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरू शकणारे एक महत्त्वाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

# देशमुख कुटुंबीयांच्या गावात आरोग्यसेवेचा आदर्श!

### वडविहीरा आरोग्य वर्धिनी केंद्राची एनक्यूएएसमध्ये दमदार भरारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मेंढला अंतर्गत येणाऱ्या आरोग्य वर्धिनी उपकेंद्र वडविहीरा यांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक (एनक्यूएएस) चाचणीत यश संपादन करून ग्रामीण आरोग्यसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दर्जेदार आरोग्यसेवा, स्वच्छता, रुग्णांप्रती संवेदनशीलता, सुयोग्य व्यवस्थापन आणि सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करण्याच्या प्रयत्नांना मिळालेले हे यश मानले जात आहे. वडविहीरा केंद्राच्या या कामगिरीमुळे गावासह परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




वडविहीरा हे देशमुख कुटुंबीयांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीशी जोडलेले गाव म्हणूनही ओळखले जाते. माजी कृषिमंत्री रणजित देशमुख, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख, अमोल देशमुख तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांच्याशी या गावाचे कौटुंबिक नाते आहे. त्यामुळे या गावाला असलेली राजकीय ओळख आणि आता ग्रामीण आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मिळालेले एनक्यूएएस यश यामुळे वडविहीराची चर्चा पुन्हा एकदा होत आहे.

एनक्यूएएस मानांकनाच्या प्रक्रियेत आरोग्य केंद्रातील रुग्णसेवा, स्वच्छता, संसर्ग नियंत्रण, औषधांची उपलब्धता, रुग्णांची सुरक्षितता, अभिलेख व नोंदवही व्यवस्थापन, पायाभूत सुविधा, आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची गुणवत्ता अशा विविध बाबींची तपासणी केली जाते. या निकषांनुसार केंद्राच्या कामकाजात सातत्यपूर्ण सुधारणा करण्यावर आरोग्य कर्मचाऱ्यांनी भर दिला. त्याचे फलित म्हणून वडविहीरा आरोग्य वर्धिनी केंद्राने एनक्यूएएस चाचणीत यश मिळविले.

ग्रामीण भागातील नागरिकांना गावाच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आरोग्य वर्धिनी केंद्रांची भूमिका महत्त्वाची आहे. माता व बाल आरोग्य, लसीकरण, नियमित आरोग्य तपासणी, आजारांबाबत जनजागृती, आरोग्यविषयक समुपदेशन तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केंद्राच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे एनक्यूएएसमधील यशामुळे नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास आणखी दृढ होण्यास मदत होणार आहे.

**स्वच्छता आणि गुणवत्तेला प्राधान्य**

वडविहीरा आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये स्वच्छता, रुग्णांशी संवेदनशील वर्तन, नोंदवहीचे योग्य व्यवस्थापन, उपलब्ध साधनसुविधांचा प्रभावी वापर आणि आरोग्य सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यावर विशेष भर देण्यात आला. मर्यादित संसाधनांमध्येही नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्यसेवा उभी करता येते, हे या केंद्राच्या कामगिरीने दाखवून दिले आहे.

या उल्लेखनीय यशासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकृष्ण नन्नावरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आकाश वाघमारे, सामुदायिक आरोग्य अधिकारी डॉ. पंकज लोही, आरोग्य सेविका चेतना आगरकर, आरोग्य सेवक बाबा डबरासे यांच्यासह सर्व आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा सेविका आणि परिचर वर्गाचे मोलाचे योगदान लाभले. त्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि सामूहिक प्रयत्नांमुळे वडविहीरा केंद्राने ही कामगिरी साध्य केली. वडविहीराने मिळविलेले एनक्यूएएसमधील यश हे केवळ एका आरोग्य केंद्राचे यश नसून ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. पुढील काळातही आरोग्यसेवेची गुणवत्ता कायम ठेवून नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि प्रभावी सेवा देण्याचा निर्धार आरोग्य विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. देशमुख कुटुंबीयांच्या गावाने आता ग्रामीण आरोग्यसेवेचा आदर्श निर्माण केल्याने वडविहीराच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.

## काँग्रेसचा बेमुदत साखळी उपोषणाचा इशारा

**पाथरी :** पाथरी नगर परिषदेतील विविध विकास कामांमध्ये झालेल्या निधी अपहाराच्या प्रकणावरुन काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. या सर्व प्रकारामुळे संतप्त झालेल्या पाथरी काँग्रेस कमिटीच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे मागणीनुसार सर्व कागदपत्रे आणि अभिलेखे चौकशी समितीचे अध्यक्ष तथा पाथरीच्या तहसीलदारांना तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा या विरोधात दि. २८ सप्टेंबर पासून नगर परिषद कार्यालयासमोर पक्षाच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगर परिषदेतील विकास कामांच्या चौकशीसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत एसआरकेच्या विद्यार्थ्यांचा जलवा, सात खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

येनिकोणी येथे गुरुवारी पार पडलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत जलालखेडा येथील एसआरके इंडो पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरीची नोंद करीत शाळेचा क्रीडा क्षेत्रातील दबदबा कायम ठेवला. विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले असून तब्बल सात विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



तालुकास्तरीय स्पर्धेत धावणे, थाळीफेक, गोळाफेक आदी विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. १४ वर्षे वयोगटात गर्वीत संजय सोनोने याने १०० मीटर व २०० मीटर धावण्यासह थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवित अष्टपैलू कामगिरी केली. मुलींच्या गटात युतिका हरीश मुरोडिया हिने १०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच यज्ञा राऊत हिने २०० व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. पायल विनायक वाडबुदे हिने ६०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला. गोळाफेकमध्ये मेघा प्रदीप कराळे हिने अव्वल स्थान मिळविले, तर भार्गवी विठ्ठलराव पाचपोहर हिने द्वितीय क्रमांक मिळवून लक्षवेधी कामगिरी केली. १७ वर्षे वयोगटातील थाळीफेक स्पर्धेत आयशा एजाज शेख हिने प्रथम क्रमांक मिळविला.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे एसआरके इंडो पब्लिक स्कूलमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांना संधी, योग्य मार्गदर्शन आणि सरावाचे वातावरण उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही जिल्हास्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, हे या कामगिरीतून अधोरेखित झाले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंकडून आता पुढील स्पर्धेतही चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी प्राचार्य शुभांगी अर्डक, शारीरिक शिक्षक पंकज ठाकरे, स्वाती गाखरे तसेच आई-वडिलांना दिले. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे अध्यक्ष रणजीत देशमुख, आमदार डॉ. आशिष देशमुख, सुधीर देशमुख, अमिशी अरोरा, कुलदीप हिवरकर, गणेश ठवरे, मुकेश चोपडे तसेच प्राचार्य शुभांगी अर्डक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे, पालकांचे आणि जलालखेडा परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

थोडक्यात

## गॅस सिलेंडरच्या नियमित पुरवठ्यासाठी महिलांचा मोर्चा

### नियमित पुरवठा न झाल्यास नागरिकांचा मोठा मोर्चा काढणार : माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महादुला परिसरातील सिद्धार्थ नगर, जय भीम नगर, फुले नगर, श्रीवास नगर, रमाई नगर तसेच महादुला शहरातील विविध



भागांमध्ये गॅस सिलेंडर पुरवठा करणारी गाडी नियमितपणे येत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील काही दिवसांपासून गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत असून, विशेषतः महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येच्या निषेधार्थ आज महिलांनी एकत्र येत गॅस कार्यालयावर मोर्चा काढून नियमित गॅस सिलेंडर पुरवठा करण्याची मागणी केली.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी यांनी संबंधित गॅस वितरण यंत्रणेला नागरिकांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले. महादुला परिसरातील सर्व भागांमध्ये गॅस सिलेंडरची गाडी नियमितपणे पोहोचली पाहिजे आणि नागरिकांना वेळेवर सिलेंडर उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. गॅस सिलेंडरचा नियमित पुरवठा हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अत्यावश्यक विषय आहे. यापुढेही गॅसची गाडी नियमितपणे महादुला परिसरातील सर्व भागांमध्ये आली नाही आणि नागरिकांची गैरसोय सुरूच राहिली, तर मोठ्या संख्येने नागरिकांना सोबत घेऊन गॅस कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी यांनी दिला. संबंधित प्रशासन व गॅस वितरण कंपनीने तातडीने दखल घेऊन महादुला परिसरातील गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पिरॅमिड गोल्ड सोसायटी गणेशोत्सव मंडळाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिर्झापुरे यांची भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, बेसा**

बेसा परिसरातील पिरॅमिड गोल्ड सोसायटी गणेशोत्सव मंडळाला हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिझापुरे यांनी भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेत आरती केली. यावेळी त्यांनी उपस्थित महिला व बालकांशी संवाद साधत महिला व बालकांच्या सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांनी सतर्क राहावे, कोणत्याही प्रकारची अडचण किंवा अनुचित प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी विजय सोनटक्के तसेच पिरॅमिड गोल्ड सोसायटीतील कुटुंबीयांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिझापुरे यांचे स्वागत केले. त्यांच्या भेटीमुळे सोसायटीतील गणेशोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली. उपस्थित नागरिकांनीही पोलिसांच्या सुरक्षा मार्गदर्शनाचे स्वागत केले.

## गणेशोत्सवात डीजेचा दणदणाट, आमगाव पोलिसांची धडक कारवाई

### सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन, डीजे चालक-मालकांविरुद्ध चार गुन्हे दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे चालक-मालकांविरुद्ध आमगाव पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या ध्वनिमयार्देचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी अवघ्या दोन ते तीन दिवसांत चार स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. आमगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत १४ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या काळात गणेशमूर्तींच्या स्थापना व विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजेचा वापर करण्यात येत होता. मात्र, ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होऊ नये, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या ध्वनिमयार्देचे पालन करणे बंधनकारक आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निवासी क्षेत्रासाठी ५५ डेसिबल, तर शांतता क्षेत्रासाठी ५० डेसिबल अशी ध्वनिमर्यादा आहे. या मर्यादेपेक्षा अधिक आवाज करणाऱ्या ध्वनिक्षेपकांचा वापर केल्यास संबंधित डीजे चालक व मालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे.

गणेश विसर्जनादरम्यान डीजे वाजविण्यात आल्याने पोलिसांनी घटनास्थळी जाऊन नॉईज लेव्हल मशीनद्वारे ध्वनीची तीव्रता तपासली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यानंतर संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी अपराध क्रमांक ६९६/२०२६, ६२३/२०२६, ६२४/२०२६ व ६२५/२०२६ असे चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे गुन्हे पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ५ तसेच ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांनुसार दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक गोंदिया गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चानपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आमगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निळकंठ घनश्याम कुकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# श्रीगणेशाच्या १ लाख ५४ हजार ५०६ मूर्तींचे विसर्जन

### मनपाच्या पर्यावरणपूरक श्री गणेश मूर्ती विसर्जनाला नागरिकांची साथ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणपती बाप्पा मोरया...पुढच्या वर्षी लवकर... या जय घोषात श्री गणरायाचे विसर्जन झाले. श्री गणरायाच्या विसर्जनासाठी मनपाद्वारे शहरातील दहाही झोनसह गोरेवाडा कृत्रिम जलकुंड, पोलीस लाईन टाकळी, सरदार वल्लभभाई पटेल कच्छीविसा मैदान आणि कोराडी येथे विशेष सोय करण्यात आली. श्रींच्या विसर्जनासाठी येणाऱ्या भक्तांना विसर्जन स्थळी कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरिता मनपाद्वारे उत्तम व्यवस्था करण्यात आली. शहरातील सर्व विसर्जन कुंडांवर एकूण १ लाख ५४ हजार ५०६ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, एकूण विसर्जीत मूर्तींमध्ये १ लाख ४५ हजार ८४८ मूर्ती मातीच्या तर पीओपीच्या फक्त ८ हजार ६५८ मूर्तींचा समावेश आहे. विशेष म्हणजे,बाराव्या दिवशी अर्थात अनंत चतुर्दशीला १ लाख २७ हजार ९७१ श्री गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तसेच एकूण १६२.७५ टन निर्माल्य संकलित करण्यात आले.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, विरोधीपक्ष नेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ.विपीन, वैद्यकीय आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे यांच्यासह इतर सर्व झोन सभापती, अधिकारी व कर्मचारी यांच्या नेतृत्वात बाप्पांच्या पर्यावरणपूरक निरोपासाठी मनपाने जय्यत तयारी करण्यात आली. पहिल्या दिवसापासून तर बाराव्या दिवसापर्यंत शहरातील सर्व विसर्जन कुंडांवर एकूण १ लाख ५४ हजार ५०६ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

शहरात पर्यावरणपूरक गणेश मूर्ती विसर्जनासाठी दहाही झोन अंतर्गत २२५ ठिकाणी ४६५ कृत्रिम हौद तयार करण्यात आले. यात घरच्या श्रीगणेश मूतीर्चे विसर्जन करण्यासाठी नागरिकांनी मनपाच्या कृत्रिम तलावांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. विशेष म्हणजे, नागरिकांना घराजवळच्या कृत्रिम तलावांची माहिती सहज उपलब्ध व्हावी याकरिता मनपाद्वारे क्यूआर कोड आणि संकेतस्थळाची सोय उपलब्ध करून दिली.



**महापौर आयुक्तांनी केले विसर्जन**

गणपती बाप्पा मोरया...!, पुढच्या वर्षी लवकर या!...अशा घोषणा देत महापौर निता ठाकरे यांनी कुटुंबातील श्री. गणेशाला भावपूर्ण निरोप दिला. मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या पर्यावरणपूरक कृत्रिम तलावांमध्ये ढोल ताशांच्या गजरात विसर्जन करण्यात आले. तर आयुक्त डॉ. विपिन यांनी देखील मनपा आयुक्त डॉ. विपीन व त्यांच्या कुटुंबियांनी निवासस्थानी विराजमान श्री गणेशाला भक्तीभावाने निरोप दिला. यावेळी श्री गणेश मूर्तीचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन कुंडात केले.

लकडगंज भागातील सरदार वल्लभभाई पटेल मैदान कच्छीविसा येथील कृत्रिम तलावात अनंत चतुर्दशीला गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर अशा घोषणा देत श्री. गणेशाला भावपूर्ण निरोप देत पर्यावरणपूरक कृत्रिम तलावांमध्ये ढोल ताशांच्या गजरात विसर्जन केले. सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या मार्गदर्शनात व सद्भावना सांस्कृतिक क्रीडा मंडळ व बहु. संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने अत्यंत सुलभपणे रात्री उशिरापर्यंत श्री. गणेशाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी विविध संस्थाच्या युवकांनी ढोलताशे व लेझिम खेळाचे चित्तथरारक प्रदर्शन केले.

**मनपा आयुक्त यांच्यासह पोलिस आयुक्त यांची पाहणी**

मनपा प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेची पोलीस आयुक्त श्री विश्वास नांगरे पाटील आणि मनपाचे आयुक्त डॉ.विपिन यांनी पाहणी केली. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री राजेंद्र दाभाडे,पोलीस उपायुक्त अन्नपूर्णा सिंग, मनपाचे उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विसर्जनस्थळे आणि प्रमुख मार्गांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

**श्री गणेश मूर्तींचे झोननिहाय विसर्जन**

लक्ष्मीनगर झोनमध्ये ४१ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून, दहाव्या दिवशी २४ हजार ६६१ मातीच्या तर १ हजार २०६ पीओपीच्या अशा एकूण २५ हजार ८६७ श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धरमपेठ झोनमध्ये ६४ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून, येथे १५ हजार ४१९ मातीच्या तर पीओपीच्या ८४६ अशा एकूण १६ हजार २६५ मूर्तींचे विसर्जन झाले. हनुमाननगर झोनमध्ये ६० कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे १६ हजार १७ मातीच्या तर ८४६ पीओपीच्या अशा एकूण १६ हजार ६६३ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धंतोली झोनमध्ये ३१ कृत्रिम तलावांमध्ये ११ हजार ९६७ मातीच्या तर ५२५ पीओपीच्या अशा एकूण १२ हजार ४९२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. नेहरूनगर झोनमध्ये ६८ कृत्रिम तलावांची व्यवस्था असून येथे १४ हजार ३४४ मातीच्या तर १ हजार १९७ पीओपीच्या अशा एकूण १५ हजार ५४१ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गांधीबाग झोनमध्ये ६८ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे २१ हजार ९० मातीच्या आणि १३० पीओपीच्या अशा एकूण २१ हजार २२० मूर्तींचे विसर्जन झाले. सतरंजीपुरा झोनमध्ये २८ कृत्रिम तलाव उभारण्यात आले आहे.येथे ११ हजार ६० मातीच्या आणि २ हजार ४२२ पीओपीच्या अशा एकूण १३ हजार ४८२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. लकडगंज झोनमध्ये ४२ कृत्रिम तलाव उभारण्यात आले.

## साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाची कार्यकारिणी बिनविरोध

### सुरेश झिबलजी झुरमुरे अध्यक्ष तर सचिवपदी दादूजी गोखले २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक, सांस्कृतिक तसेच विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळ, उमरेडच्या नवीन कार्यकारिणीची २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी बिनविरोध निवड करण्यात आली. मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ही निवड करण्यात आली.

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रभाकरराव लांजेवार होते, तर निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. पारस



सुरेश झुरमुरे



दादुजी गोखले

शंभरकर यांनी काम पाहिले. सभेला मंडळाचे ८७ सभासद उपस्थित होते.

विषयसूचीनुसार विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सुरेश झिबलजी झुरमुरे, उपाध्यक्षपदी मधुकर राजाराम फुकट, सचिवपदी दादूजी गोखले, सहसचिवपदी रामूजी धोटे तर कोषाध्यक्षपदी शरदराव व्यवहारे यांची निवड झाली. कार्यकारी सदस्य म्हणून रामभाऊ तांबडे, मनोहर तोंडे, प्रकाश जुमडे, दूधराम गायधने, अलका रेवतकर व स्मिता देशमुख यांची, तर सल्लागार समितीवर नत्थुजी मेश्राम व प्रभाकरराव लांजेवार यांची निवड करण्यात आली.

साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाकडून वर्षभर विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन केले जाते. ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाचे स्थान मिळावे, त्यांच्या अडचणी व विविध प्रश्न समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्यासाठी मंडळाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात. विविध उपक्रमांचे योग्य नियोजन, सभासदांचा सहभाग आणि सामाजिक बांधिलकी यामुळे मंडळाने उमरेडमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आगामी पाच वर्षांत ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिक व्यापक स्वरूपाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबवून मंडळाचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## श्री निकेतन महाविद्यालय आणि कामयाब फाऊंडेशनच्यावतीने गणेश विसर्जन दिनी निर्माल्य संकलन उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री निकेतन बहुउद्देशीय संस्था संचालित श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, तुळसीबाग रोड, रेशीमबाग, नागपूर आणि कामयाब फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अनंत चतुर्दशी व गणेश विसर्जनाच्या पावन दिनी निर्माल्य संकलन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. "निर्माल्य टाकू नका, प्लास्टिकचा वापर टाळा, पर्यावरण स्वच्छ व सुंदर ठेवा" असा संदेश देत नागरिकांमध्ये सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

विसर्जन घाटावर फेकले जाणारे निर्माल्य, फुले, हार यामुळे होणारे जलप्रदूषण टाळावे आणि नदी, तलाव स्वच्छ राहावेत यासाठी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नागरिकांचे प्रबोधन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मेधा कानेटकर प्राध्यापक व कामयाब फाऊंडेशनचे हितेश डोरलीकर यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## नागपूर 'पर्यटन जिल्हा', विदर्भाच्या पर्यटन विकासाला नवी दिशा

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नागपूर : महाराष्ट्र शासनाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी नागपूर जिल्ह्याला अधिकृतपणे पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले आहे. जिल्ह्यातील नैसर्गिक, वन्यजीव, धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पर्यटनसंपदेचा विकास करणे, पर्यटनाला चालना देणे तसेच स्थानिक रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला गती देणे, ही या निर्णयामागील प्रमुख उद्दिष्टे असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. जागतिक पर्यटन दिनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या निर्णयामुळे नागपूरच्या पर्यटन विकासाकडे नव्याने लक्ष वेधले गेले आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी, संत्रानगरी आणि व्याघ्र राजधानी अशी ओळख असलेल्या नागपूर जिल्ह्यात पर्यटनाच्या विविध प्रकारांचा समावेश आहे. रामटेकचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व, नागपूर शहरातील दीक्षाभूमी व शून्य मैल, गोंड आणि भोसलेकालीन वारसा, पेंच राष्ट्रीय उद्यान, खिंडसीचे जलक्रीडा पर्यटन तसेच मनसर



येथील पुरातत्त्वीय वारसा यामुळे जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, वन्यजीव आणि जलक्रीडा पर्यटनाच्या विविध शक्यता आहेत.

या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांना परस्परांशी जोडण्याची आवश्यकता असल्याचे चंद्रपाल चौकसे यांनी म्हटले आहे. रामटेक, खिंडसी, मनसर आणि पेंच या स्थळांना जोडणारे पर्यटन सर्किट विकसित केल्यास विविध प्रकारच्या पर्यटनाचा एकत्रित अनुभव पर्यटकांना देता येऊ शकतो. अशा सर्किटमुळे पर्यटकांचा जिल्ह्यातील मुक्काम वाढण्यास तसेच हॉटेल, रेस्टॉरंट, वाहतूक, होमस्टे, हस्तकला आणि स्थानिक बाजारपेठेशी संबंधित व्यवसायांना चालना मिळण्याची शक्यता असल्याचे चौकसे यांनी नमूद केले आहे.

पर्यटन क्षेत्राचा विस्तार झाल्यास स्थानिक युवकांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, असेही चंद्रपाल चौकसे पर्यटन मित्र यांनी म्हटले आहे. पर्यटन मार्गदर्शक, हॉटेल व्यवस्थापन, होमस्टे, वाहतूक, जलक्रीडा, छायाचित्रण, डिजिटल विपणन आणि स्थानिक खाद्यसंस्कृतीशी संबंधित व्यवसायांमध्ये कौशल्यविकासाला प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. महिला बचतगटांना स्थानिक खाद्यपदार्थ, हस्तकला आणि पर्यटकांसाठी आवश्यक सेवांशी जोडल्यास पर्यटनातून निर्माण होणाऱ्या आर्थिक संधींचा



लाभ स्थानिक पातळीवर अधिक व्यापकपणे पोहोचू शकतो, असे त्यांचे मत आहे.

नागपूरला 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित केल्यानंतर आता स्वतंत्र पर्यटन विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता असल्याचे चौकसे यांनी म्हटले आहे. या आराखड्यात पर्यटनस्थळांचे नियोजन, पायाभूत सुविधा, पर्यटन सर्किट, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि प्रचार-प्रसार यांचा समावेश असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रमुख पर्यटनस्थळांवर रस्ते, पार्किंग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना आणि दिशादर्शक फलक यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच पर्यटनस्थळांचे प्रभावी डिजिटल विपणन करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली आहे.

नागपूरचे भौगोलिक स्थान लक्षात घेता जिल्ह्याचा पर्यटन विकास केवळ नागपूरपुरता मर्यादित न राहता विदभार्तील इतर जिल्ह्यांच्या पर्यटनालाही चालना देऊ शकतो, असे चौकसे यांनी म्हटले आहे. नागपूरला विदर्भ पर्यटनाचे प्रवेशद्वार म्हणून विकसित करण्याची संधी असून, नागपूरमार्गे विदभार्तील विविध पर्यटनस्थळांना जोडणारे नियोजन केल्यास या क्षेत्राला व्यापक स्वरूप मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले.

पर्यटन जिल्हा हा दर्जा मिळणे ही पर्यटन विकासाची सुरुवात असून, त्याचे प्रत्यक्ष परिणाम पायाभूत सुविधा, नियोजन,



गुंतवणूक आणि प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून राहतील, असे चंद्रपाल चौकसे पर्यटन मित्र यांनी स्पष्ट केले आहे. नागपूरच्या पर्यटन क्षमतेचा नियोजनबद्ध वापर केल्यास स्थानिक रोजगार, पर्यटन व्यवसाय आणि आर्थिक उपक्रमांना चालना मिळू शकते. त्यामुळे शासनाच्या घोषणेनंतर आता प्रत्यक्ष कृती आणि विकास आराखड्याच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.